- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

सोने-चांदी
✔ २४ कॅरेट : १,४०,९०० /-
✔ २२ कॅरेट : १,२८,३५० /-
✔ चांदी : १,८८,३००/-

दैनिक
सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर
संचालक-संपादक : अजय बिवडे

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

Reg. No : MHBIL/25/A4140 Mail Id : sinhvanivrutta@gmail.com दिनांक : गुरूवार, १२ नोव्हेंबर २०२६ Epaper : epaper.sinhvani.com पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : ३३२ | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

पाकिस्तानात पोलिसांच्या पथकावर हल्ला, ११ पोलीसांचा जागीच मृत्यू, १२ जखमी

वृत्तसंस्था, पाकिस्तान

पाकिस्तानातून एक धक्कादायक बातमी समोर येत आहे. पाकिस्तानमध्ये पोलिसांच्या एका पथकावर मोठा हल्ला झाल्याची घटना आहे. देशाच्या वायव्य भागात बंदूकधाऱ्यांनी पोलिसांच्या पथकाला लक्ष्य केले. या हल्ल्यात आतापर्यंत एका डीएसपीसह ११ पोलीसांचा मृत्यू झाला आहे. तर १२ जण जखमी झाले आहेत. हा हल्ला खैबर पख्तुनख्वा प्रांतातील कोहाट जिल्ह्यात झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पोलिसांचे पथक अवैध सोन्याच्या खाणकामाविरोधात छापा टाकण्यासाठी जात होते. दबा धरून बसलेल्या बंदूकधाऱ्यांनी पोलिसांच्या पथकावर अंदाधुंद गोळीबार केला.

हल्ल्यानंतर पाच पोलीस वाहने जाळली

हा हल्ला कोहाट आणि करक जिल्ह्यांच्या दरम्यान असलेल्या दरबोकाच जालंधर बांदा परिसरात झाला. हल्लेखोरांनी पोलीस पथकावर गोळीबार



केला आणि त्यानंतर पाच पोलीस वाहने जाळून टाकली. या घटनेमुळे परिसरातील सुरक्षेची चिंता वाढली आहे. तथापि, हल्लेखोरांची ओळख आणि संख्येबाबतचा तपशील जाहीर करण्यात आलेला नाही.

खैबर पख्तुनख्वामध्ये पोलिसांवरील हल्ल्यांमध्ये वाढ

गेल्या काही महिन्यांत पाकिस्तानच्या खैबर पख्तुनख्वा प्रांतात पोलीस कर्मचाऱ्यांना लक्ष्य करून अनेक हल्ले झाले आहेत. या घटनांमुळे या प्रदेशातील सुरक्षा परिस्थितीबद्दल प्रश्न निर्माण झाले आहेत. पोलीस आणि इतर सुरक्षा दलांवरील हल्ल्यांमध्ये सातत्याने वाढ झाली आहे. आर्म्ड कॉन्फ्लिक्ट लोकेशन अँड इव्हेंट डेटाच्या आकडेवारीनुसार, २०२२ पासून पाकिस्तानमधील दहशतवादी हल्ल्यांची संख्या दरवर्षी वाढत आहे. २०२२ मध्ये देशात ६५८ हल्ल्यांची नोंद झाली होती. २०२५ मध्ये ही संख्या वाढून २४२५ झाली. याचा अर्थ असा की, गेल्या तीन वर्षांत हल्ल्यांची संख्या जवळपास चौपट झाली आहे. या आकडेवारीवरून असे दिसून येते की, पाकिस्तानसमोरील सुरक्षा आव्हाने अधिकाधिक गंभीर होत आहेत.


हा हल्ला कोहाट आणि करक जिल्ह्याच्या मध्ये असलेल्या जलंधर बांदा या भागात झाला. मिळालेल्या माहितीनुसार, हा हल्ला कोहाट आणि करक जिल्ह्याच्या मध्ये असलेल्या जलंधर बांदा या भागात झाला आहे. यामध्ये हल्लेखोरांनी पोलिसांवर गोळीबार केल्यानंतर पोलिसांच्या पाच वाहनांना आग लावली.

ही भयानक घटना समोर आल्यानंतर खैबर पख्तुनख्वा या भागात एकच खळबळ उलाडी आहे. कायदा आणि सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न उपस्थित झालाय. या प्रकरणाची चौकशी केली जात आहे.

थोडक्यात

मदर डेअरीपाठोपाठ अमुलचे दूधही महागले

मुंबई : सर्वसामान्यांच्या खिशाला पुन्हा एकदा कात्री लागणार आहे. मदर डेअरीने दूधाचे दर वाढवल्यानंतर आता अमुलनेही देशभरात ताज्या पाऊच दुधाच्या दरात प्रतिलिटर २ ते ४ रुपयांची वाढ जाहीर केली आहे. ही दरवाढ गुरुवार, १२ नोव्हेंबरपासून लागू होणार असून, यामुळे दुधाच्या किमती ४ ते ५ टक्क्यांनी वाढल्या आहेत. अमुल ब्रँडअंतर्गत दुधाची विक्री करणाऱ्या गुजरात को-ऑपरेटिव्ह मिल्क मार्केटिंग फेडरेशनने दिलेल्या माहितीनुसार, चारा, जनावरांचे खाद्य, पॅकेजिंग साहित्य आणि इंधनाच्या दरात सातत्याने वाढ झाल्याने उत्पादन व प्रक्रिया खर्च मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. या वाढत्या खचार्मुळेच दरवाढ करणे भाग पडल्याचे फेडरेशनने स्पष्ट केले आहे. या दरवाढीमुळे मिळणाऱ्या अतिरिक्त महसुलाचा मोठा वाटा थेट दूध उत्पादक शेतकऱ्यांना मिळणार असून, त्यांना योग्य मोबदला मिळण्यास मदत होईल, असेही फेडरेशनने नमूद केले. जीसीएमएमएफने एका निवेदनात सांगितले की, सर्वाधिक खप असलेल्या ३ टक्के फॅटयुक्त अमुल ताजा टोन्ड दुधाच्या दरात केवळ २ रुपये प्रतिलिटर (३.३ टक्के) वाढ करण्यात आली आहे. तर ६ टक्के फॅट असलेल्या अमुल गोल्डच्या दरात प्रतिलिटर ४ रुपये (५.५ टक्के) वाढ झाली आहे. यापूर्वी अमुलने चालू वर्षातील मे महिन्यात प्रतिलिटर २ रुपयांची दरवाढ केली होती.



ईपीएफओच्या पेन्शनधारकांना दिलासा? १००० वरुन ३००० रुपये होणार असल्याच्या चर्चा

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

ईपीएफओनं २४० व्या सेंट्रल बोर्ड ऑफ ट्रस्टीजची बैठक गुजरातमधील गीर ऐवजी नवी दिल्लीत घेण्याचा निर्णय घेतला आहे. ही बैठक १९ नोव्हेंबरला होणार आहे. या बैठकीत ईपीएफओकडून ईपीएस पेन्शन योजनेतून मिळणाऱ्या मासिक पेन्शनची रक्कम १००० रुपयांवरुन ३००० रुपयांपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतला जाऊ शकतो, अशा प्रकारच्या चर्चा सुरु आहेत.

ईपीएफओनं सीबीटीची बैठक गुजरातऐवजी नवी दिल्लीत घेण्याचा निर्णय घेतला आहे.या बैठकीच्या पार्श्वभूमीवर किमान ईपीएस पेन्शनची रक्कम वाढवण्याचा निर्णय घेतला जाऊ शकतो, अशा प्रकारचे रिपोर्ट प्रसिद्ध झाले आहेत. मीडिया रिपोर्टनुसार ईपीएफओकडून किमान ईपीएस पेन्शन १००० रुपयांवरुन ३००० रुपये करण्याबाबत विचार केला जातोय. रिपोर्टनुसार केंद्रीय श्रम मंत्रालय या संदर्भातील निर्णय घेताना वित्त मंत्रालयाशी चर्चा करुन नंतर निर्णय घेईल.

सीबीटीच्या १९ नोव्हेंबरच्या बैठकीत ईपीएस पेन्शनवाढीचा मुद्दा स्वतंत्र अजेंड्यावर असेल, असा देखील दावा केला जातोय. ईपीएस पेन्शन वाढीसंदर्भात वृत्त प्रकाशित काही माध्यमांमध्ये प्रसिद्ध झालं असलं तरी अद्याप ईपीएफओनं अथवा केंद्रीय श्रम आणि रोजगार मंत्रालयाकडून यासंदर्भात उत्तर देण्यात आलेलं नाही.

फेब्रुवारी २०१४ पासून किमान पेन्शन रक्कम १००० रुपये आहे. फेब्रुवारी २०२४ मध्ये सीबीटी म्हणजेच ईपीएफओच्या सेंट्रल बोर्ड ऑफ ट्रस्टीजनं ईपीएस पेन्शन १००० रुपये करण्याचा निर्णय घेतला होता. तत्कालीन वित्त मंत्र्यांनी २०१४-१५ च्या अर्थसंकल्पात याची घोषणा केली होती. तर, केंद्र सरकारनं ऑगस्ट २०१४ मध्ये यासंदभार्तील नोटिफिकेशन काढलं होतं.

ईपीएस पेन्शनधारकांकडून किमान मासिक पेन्शन ७५०० रुपये करण्याची मागणी करण्यात येत आहे. सध्याची किमान पेन्शन १००० रुपये आहे. यामध्ये उदरनिर्वाह करणं शक्य नसल्यानं किमान पेन्शन रक्कम ७००० रुपये करण्याची माणी आहे. ईपीएफओकडून ईपीएस योजनेद्वारे पेन्शन दिली जाते. किमान पेन्शन रक्कम १००० रुपये असून कमाल पेन्शन रक्कम निश्चित केलेली नाही. दरम्यान, पेन्शन रक्कम ही पेन्शन योग्य सेवा आणि पगारावर अवलंबून असते. ईपीएससाठी पगाराची रक्कम २५००० रुपये निश्चित करण्यात आली आहे. जी १५ हजार रुपयांवरुन सप्टेंबर महिन्यात वाढवण्यात आली होती. ईपीएस २०२६ नुसार नियोक्त्यांकडून दिलं जाणारं योगदान मूळ वेतनाच्या ८.३३ टक्के किंवा २०८३ रुपये यापेक्षा जे कमी असेल तितकं असेल.

नागपुरात मांजरीला फासावर लटकावून क्रूर हत्या

नागपूर : नागपूरच्या हुडकेश्वर परिसरातील सर्वश्री नगरात मात्र माणुसकीला काळिमा फासणारी एक अमानवीय घटना समोर आली. अंधश्रद्धेच्या संशयातून एका मुक्या, निष्पाप मांजरीला गळ्यात दोरीचा फास आवळून झाडाला लटकावून ठार मारल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. या घटनेमुळे प्राणीप्रेमींनी संताप व्यक्त केला आहे.दिवाळी सणाचा आनंद सुरू असताना, सर्वश्री नगर भागात एका झाडावर मांजरीला दोरीने फासावर लटकावल्याचे दृश्य काहींच्या निदर्शनास आले. हा प्रकार समजताच सेव्ह स्पीचलेस संघटनेच्या प्राणी कल्याण कार्यकर्त्या रश्मी शेखर मसराम तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी कोणतीही वेळ न घालवता मांजरीला झाडावरून खाली उतरवले आणि उपचारासाठी जिल्हा पशुवैद्यकीय रुग्णालयात धाव घेतली. मात्र, तोपर्यंत खूप उशीर झाला होता; उपचारापूर्वीच त्या मुक्या प्राण्याने प्राण सोडले होते.या गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता, रविवारची सुटी असतानाही जिल्हा पशुवैद्यकीय रुग्णालय उघडून मांजरीचे शवविच्छेदन करण्यात आले. गळ्याभोवती दोरीचा तीव्र दाब पडल्यामुळे तिचा श्वास गुदमरला आणि मृत्यू झाल्याचे अहवालात स्पष्ट झाले आहे.


चौरी चौरा एक्सप्रेस रुळावरुन घसरली

कोणतीही जीवितहानी झालेली नाही

वृत्तसंस्था, कानपूर

उत्तर प्रदेशातील कानपूरमध्ये धक्कादायक घटना घडली आहे. चौरी चौरा एक्सप्रेस रुळावरुन घसरल्याची घटना घडली आहे. रेल्वे अपघातामुळं प्रवाशांमध्ये घबराट पसरली आहे. कानपूर सेंट्रल स्टेशनवरून निघाल्यानंतर थोड्याच वेळात चौरी चौरा एक्सप्रेस रुळावरून घसरली आहे. अनवरगंजहून गोरखपूरला जाणारी ट्रेन क्रमांक १५००३ देखील रुळावरून घसरल्याने प्रवाशांमध्ये घबराट पसरली. रेल्वे अधिकारी सध्या घटनास्थळी असून ट्रेन पुन्हा रुळावर आणण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, ट्रेन प्लॅटफॉर्म क्रमांक ७ वरून निघाली होती. थोड्याच अंतरावर ट्रेनचे चार डबे रुळावरून घसरले. सुदैवाने, आतापर्यंत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. दरम्यान, अचानक चौरी चौरा एक्सप्रेस रुळावरुन घसरल्यानं प्रवाशांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झाले आहे. उत्तर मध्य रेल्वे, प्रयागराज विभागाने दिलेल्या माहितीनुसार, ट्रेन क्रमांक १५००३ बुधवारी कानपूर अनवरगंज स्थानकावरून गोरखपूरसाठी रवाना झाली. सायंकाळी ५ वाजून ३ मिनीटांनी ती कानपूर सेंट्रल स्थानकाच्या फलाट



क्रमांक ७ वर पोहोचली. सुमारे दोन मिनिटांनंतर, सायंकाळी ५ वाजून ५ मिनीटांनी स्थानकावरून पुढे जात असताना ट्रेनचे चार डबे रुळावरून घसरले. यामध्ये बी-४, बी-५, बी-६ आणि बी-७ या डब्यांचा समावेश होता. रेल्वेच्या म्हणण्यानुसार, चारही डब्यांमधील प्रत्येकी एक ट्रॉली रुळावरुन घसरली आहे.

घटनेची माहिती मिळताच रेल्वेचे अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. कानपूरचे उपमुख्य मोटार वाहन अधिकारी (सीटीएम) यांच्या नेतृत्वाखाली मदत आणि बचाव कार्य सुरू करण्यात आले. प्रयागराजहून वरिष्ठ अधिकारीही घटनास्थळी रवाना झाले. रेल्वे घटनास्थळी आवश्यक सुरक्षा उपाययोजना करत आहे. घटनेचे कारण निश्चित करण्यासाठी तपास केला जाईल.

दुचाकीला अज्ञात वाहनाची धडक, दोघे ठार, तिसरा तरूण गंभीर

दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वरील चोरबाहुली शिवारात मंगळवारी दि. १० नोव्हेंबर रोजी रात्री १० वा दरम्यान अज्ञात वाहनाने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात १२ वर्षीय बालकासह दुसऱ्याचाही मृत्यू झाला, तर एक जण गंभीर जखमी झाला. या घटनेमुळे रामटेक परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मृतांमध्ये सौरव अनंतराम वाढीवे वय १२ आणि अजय मधुकर कृपाले वय २९ , दोघेही रा. विनोबा भावे वार्ड, रामटेक, यांचा समावेश आहे. तर सुनील मानिकराव गजाम (३२) हा



गंभीर जखमी झाला असून त्याला पुढील उपचारासाठी नागपूर येथे हलविण्यात आले आहे.

प्राप्त माहितीनुसार, तिघेही पवनी येथून रामटेककडे होंडा शाईन दुचाकी क्रमांक एमएच ३१ ईव्ही १८९९ ने परत येत होते. दरम्यान, चोरबाहुली शिवारात अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. अपघातानंतर तिघांनाही रामटेक येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान डॉक्टरांनी सौरव आणि अजय यांना मृत घोषित केले.

या प्रकरणी मृत सौरवचे वडील फागोराम वाढीवे यांच्या तक्रारीवरून देवलापार पोलिसांनी अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. भरधाव व निष्काळजीपणे वाहन चालवून अपघात घडविल्यानंतर चालक घटनास्थळावरून पसार झाल्याची माहिती तक्रारीत देण्यात आली आहे. पुढील तपास देवलापार पोलीस स्टेशन चे ठानेदार नारायण तुरकुंडे यांच्या मार्गदर्शनात देवलापार पोलीस करीत आहेत.

वजन-मापे विभागाच्या निष्क्रियतेमुळे ग्राहकांची सर्रास आर्थिक लूट!

बाजारपेठेत विनाप्रमाणित वजनकाट्यांचा सुळसुळाट, वैध मापनशास्त्र विभागाच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण करणे आणि बाजारपेठेत योग्य वजन व मापांची खात्री करणे या महत्त्वपूर्ण उद्देशाने वैध मापनशास्त्र विभागाची स्थापना करण्यात आली आहे. मात्र, राज्यातील अनेक बाजारपेठांमध्ये या विभागाकडून आपल्या मूलभूत कर्तव्यांचे प्रभावीपणे पालन होत नसल्याचे चित्र समोर येत आहे. विभागाच्या निष्क्रियतेमुळे सर्वसामान्य ग्राहकांची मोठ्या प्रमाणावर आर्थिक फसवणूक होत असल्याचा गंभीर आरोप करण्यात येत आहे.

सध्या मांस, मासे, फळे आणि भाजीपाल्याच्या किरकोळ बाजारपेठांमध्ये ग्राहकांची मोठ्या प्रमाणावर आर्थिक लूट सुरू असल्याची तक्रार आहे. अनेक ठिकाणी विनाप्रमाणित, अप्रमाणित तसेच विनाशिकांकित वजनकाट्यांचा सर्रास वापर केला जात असून, दोषी व्यापाऱ्यांवर विभागाकडून ठोस दंडात्मक कारवाई होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. इतकेच नव्हे, तर काही ठिकाणी स्टीलचे वजनकाटे आणि इलेक्ट्रॉनिक वजनकाट्यांमध्ये अनधिकृत फेरफार करून ग्राहकांची फसवणूक केली जात असल्याचेही सांगण्यात येत आहे.

याशिवाय, आधुनिक इलेक्ट्रॉनिक वजन काट्यांमधील किलोग्रॅम-ते-लिटर रूपांतरण प्रणालीचा गैरवापर होत असल्याचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला आहे. घन आणि द्रव पदार्थ एकाच यंत्रावर मोजण्यासाठी बनविलेल्या या यंत्रणांचा वापर करून ग्राहकांची दिशाभूल केली जात असल्याची तक्रार आहे. परिणामी, बाजारात खरेदी केलेले १ किलो तेल किंवा तत्सम पदार्थ प्रत्यक्षात ७०० ते ८०० ग्रॅम भरत असल्याचा दावा करण्यात आला असून, यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या खिशाला मोठा फटका बसत आहे.

पेट्रोल पंपांवरील फसवणुकीच्या तक्रारींकडेही दुर्लक्ष?

पेट्रोल पंपांवरील परिस्थितीही चिंताजनक असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. इंधन वितरणातील संभाव्य गैरप्रकार आणि किडकिड्या समाजमाध्यमांमध्ये वारंवार प्रसारित होत असलेल्या तक्रारी याबाबतही संबंधित विभागाकडून ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. अशा प्रकारच्या तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन तपासणी व कारवाई करणे अपेक्षित असताना प्रशासनाची भूमिका संशयास्पद असल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे.

अधिकारी आणि व्यापाऱ्यांमधील संभाव्य साटेलोटे?

विभागाच्या सातत्यपूर्ण उदासीनतेमुळे सामान्य नागरिकांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला आहे. संबंधित अधिकारी या गैरप्रकारांना आळा घालण्यात असमर्थ ठरत आहेत की जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहेत, असा सवाल उपस्थित केला जात आहे. काही व्यापारी आणि संबंधित अधिकाऱ्यांमधे साटेलोटे असल्याचा संशयही तक्रारीत व्यक्त करण्यात आला आहे. या सर्व प्रकारांची वरिष्ठ प्रशासनाने तातडीने दखल घेऊन राज्यातील बाजारपेठांमध्ये विशेष तपासणी मोहीम राबवावी, विनाप्रमाणित व फेरफार केलेल्या वजनकाट्यांवर कठोर कारवाई करावी, तसेच कर्तव्यात कसूर करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावरही कारवाई करावी, अशी जोरदार मागणी करण्यात आली आहे.

ग्राहकांची आर्थिक लूट थांबणार कधी? हाच सर्वसामान्य जनतेचा प्रशासनाला सवाल आहे.

वडिलांसह दोन मुलींचा धरणाच्या पाण्यात बुडून मृत्यू

वृत्तसंस्था, नाशिक

सध्या सर्वत्र दिवाळी सणाचा उत्साह असून पै पाहुणे एकमेकांकडे दिवाळीसाठी जात येत आहेत. मात्र, ऐन उत्सवणात जिल्ह्यातील बेझे धरणात आंघोळीसाठी गेलेल्या एकाच कुटुंबातील तिघांचा बुडून्मृत्यू झाल्याची दुर्घटना घडली. भाऊबीजेदिवशीच चव्हाण कुटुंबीयांवर काळाने घाला घातल्याने सर्वत्र हळहळ होत आहे. नाशिकच्या त्र्यंबकेश्वर तालुक्यातील अंजनेरी शिवारात ही घटना घडली. त्यामध्ये, वडिलांसह दोन मुलींचा जीव गेल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

बेझे धरणाच्या लगत असलेल्या उत्तम चव्हाण यांच्याकडे दिवाळीनिमित्त पाहुणे आलेल्या एकाच कुटुंबातील तीन जणांचा धरणातील पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची मन हेलावणारी घटना घडली. सकाळच्या सुमारा आंघोळीसाठी धरणाजवळील पाण्याकडे गेले असता, आंघोळीसाठी धरणाच्या पाण्यात उतरले असता त्यांचा बुडून मृत्यू झाला. धरणाच्या पाण्याचा अंदाज न आल्याने वडील आणि दोन मुलींचा मृत्यू झाला आहे. सुरेश नामदेव भोर (वय ४२ वर्ष), ज्योती सुरेश भोर (वय १० वर्ष) आणि हर्षदा सुरेश भोर (वय ७ वर्ष) अशी मृत्यू झालेल्यांची नावे आहेत.

दैनिक सिंहवाणी वृत्त Epaper : epaper.sinhvani.com दिनांक : गुरुवार, १२ नोव्हेंबर २०२६

संपादकीय लेखणीतून...

शिक्षकी पेशाला नकार?

शासकीय नोकरी कुणाला हवी नसते ? सरकारी नोकरीसाठी तर हल्लीच्या बेरोजगारीच्या काळात लाखो रुपयांच्या पिशव्या घेऊन फिरणारे तरुण तरुणी दिसून येतील. सोयरिकी प्रसंगी म्हणा किंवा समाजात प्रतिष्ठा मिळावी म्हणावी म्हणून सरकारी नोकरीला प्राधान्य दिले जाते. त्यासाठी बारा बारा तास अभ्यास करणे. लाखो रुपयांचे डोनेशन देणे. वय निघून जात असेल तरीही नुसत्या परीक्षांच परीक्षा देणे, हे सर्व प्रकार बघितल्यावर आजच्या काळात सरकारी नोकरी किती कठीण आणि दुर्लभ म्हणावी अशी होत चालली आहे. काही सरकारी नोकऱ्यांवर तर सरकारनेच अंकुश लावल्यासारखे झाले आहे. तरी सुद्धा सरकारी नोकरीची ओढ तरुणांच्या मनातून कमी होत नाही. त्यातल्या त्यात गलेलठ्ठ पगाराची आणि समाजात प्रतिष्ठा पद मिळवून देणारी शिक्षकाची नोकरी असेल तर काय म्हणावे ! आणि ही शिक्षकाची नोकरी कुठलेही डोनेशन न देता फक्त आपल्या अभ्यासाच्या आणि कर्तृत्वाच्या बळावर पदरी पडत असेल तर काहीच कमी नाही. मात्र, अशी सरकारी आणि तीही जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांची नोकरी हाती आल्यावर जर कुणी या नोकरीला नाकारत असेल तर मात्र, या विषयाला सरकारने नक्कीच गांभीयनि घ्यायला हवे. कारण, एकीकडे जिल्हा परिषद शाळा बंद पडत असतांना जर शिक्षकच अशा ठिकाणी शिकवायला जाण्यासाठी तयार नसतील किंवा अशा नोकऱ्यांना रामराम करत असतील तर यातून सामान्य आणि गरिबांच्या लेकरांचेच नुकसान होणार आहे, धनदांडग्यांच्या मुलांचे नव्हे !

नुकतेच राज्यात पवित्र पोर्टलच्या माध्यमातून बऱ्याच वर्षांनी का होईना जिल्हा परिषद शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली. नोकरीसाठी प्रयत्न करणाऱ्या अनेकांना याचा आनंद झाला असला तरी, नागपूर विभागातील आठ शिक्षकांनी समुपदेशन प्रक्रियेत कुठलेही कारण न देता सहभागी न होणे म्हणजे या मास्तरकीला नकार तर देत नाही ना! या शंकेला वाव देण्यासारखे आहे. नुकतेच झालेल्या समुपदेशन प्रक्रियेत विभागात पोर्टलद्वारे नियुक्त १०३ शिक्षकापैकी ९५ जणच सहभागी होणे म्हणजे सरकारला विचार करण्यास बाध्य करण्यासारखे आहे. एखाद्याची प्रकृती ठीक नसेल किंवा दुसरी नोकरी मिळाली असेल तर समजू शकतो. मात्र, ज्या नोकरीसाठी कुणी अर्धे आयुष्य खर्ची घालतात त्या नोकरीच्या समुपदेशन प्रक्रियेत तब्बल आठ जणांनी दांडी मारावी म्हणजे चिंताजनकच म्हणायचे. प्राथमिक शिक्षणाधिकारी निलेश गुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रक्रिया पार पडली आहे. एकीकडे जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांची पदे रिक्त असल्याची ओरड होत असतांना आठ शिक्षकांनी कुठलेही कारण न देता अनुपस्थित राहणे म्हणजे जिल्हा परिषद शाळेची आणि शिक्षकांची जी दुरवस्था हल्ली बघावला मिळते त्यावर विचार मंथन करण्याची वेळ निघून जात आहे असेच म्हणावे लागते.

जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांच्या मागे लावलेली अशैक्षणिक कामे, हे तर यामागचे कारण नसावे ना! यावर विचार करणे गरजेचे आहे. निवडणूक आली की बोलवा शिक्षक... जनगणना आली की बोलवा शिक्षक... त्यानंतर शाळेतील हजेरी रेकॉर्ड ठेवणे, पोषण आहाराचा रेकॉर्ड ठेवणे... विविध जयंत्या पुण्यतिथ्यांचे कार्यक्रम घेणे... वरून विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करण्याचे दडपण आणि परीक्षांचे वेळापत्रक, परीक्षा घेणे... निकाल लावणे हे सर्व आलेच. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे जिल्हा परिषद शाळांतील पटसंख्येचा घसरता आलेख. तो टिकवून ठेवणे तसेच नवीन विद्यार्थ्यांचे प्रवेश करणे हे आता जिकिरीचे काम झाले आहे. त्यामुळे वरील सर्व बाबींचा विचार करता वासाठी तर भावी शिक्षक गैरहजर राहिले नाही ना! अशी शंका उपस्थित होणे रास्त दरते. आता यातील अनेक कामांचे मानधन मिळते आणि शासकीय सुट्ट्यांचा लाभ मिळतो ही बाब निराळी. मात्र, हेच मानधन आणि इतर सवलती अन्य बेरोजगारांना देऊन त्यांच्याकडून ही कामे करवून घेतल्यास शिक्षकांच्या मागे लावलेली ही कामे कमी होतील आणि त्यांना विद्यार्थ्यांना शिकविण्यास वेळ मिळेल. इतर खासगी शाळांच्या तुलनेत उद्या कदाचित जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थी सुद्धा सरस तरू लागतील. नव शिक्षक नियुक्ती करतांना शासनाने निदान या गोष्टींचा विचार करायला हवा. देशाची भावी पिढी घडविण्याचे कार्य हे शिक्षक करत असतात आणि जिल्हा परिषद शाळांची दुरवस्था बघता जर भावी शिक्षकच या नोकरीला गांभिर्याने घेत नसतील तर देशातील विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारातच म्हणावे लागते.

– लीलाधर दवंडे, कामठी (नागपूर)
८४१२८७७२२०

विश्वात शांतता टिकवून ठेवण्यात क्रिकेटचे योगदान

क्रिकेट : खेळापलीकडे जाऊन विश्वबंधुत्व आणि मानवतेचा संदेश देणारे प्रभावी माध्यम मने जोडणारा खेळ

आज संपूर्ण जग युद्ध, दहशतवाद, धार्मिक कट्टरता, वंशभेद आणि राजकीय संघर्ष यांसारख्या गंभीर आव्हानांचा सामना करीत आहे. देशांमधील वाढता अविश्वास आणि समाजात पसरत असलेली द्वेषाची भावना मानवतेच्या भवितव्यापुढे मोठे प्रश्न निर्माण करीत आहे. अशा परिस्थितीत जागतिक शांतता प्रस्थापित करणे केवळ राजकीय समझोत्याद्वारे किंवा राजनैतिक प्रयत्नांतून शक्य नाही. त्यासाठी लोकांच्या मनात सहिष्णुता, सहकार्य, समानता आणि परस्पर सन्मानाची भावना विकसित होणेही तितकेच आवश्यक आहे.

खेळ हे मानवी मूल्ये रुजविण्याचे प्रभावी माध्यम आहे. विशेषतः क्रिकेट हा जगातील अनेक देशांमध्ये कोट्यवधी लोकांच्या आवडीचा खेळ असून, विविध संस्कृती आणि समाजांना एकाच व्यासपीठावर आणण्याची त्याच्यात अद्भुत क्षमता आहे. मैदानावर खेळणारे खेळाडू वेगवेगळ्या भाषा बोलतात, विविध परंपरांचे प्रतिनिधित्व करतात आणि आपल्या देशासाठी खेळतात; परंतु खेळाचे समान नियम त्यांना एका सूत्रात बांधतात. क्रिकेटचे हेच वैशिष्ट्य त्याला केवळ मनोरंजनापुरते मर्यादित न ठेवता विश्वबंधुत्व, सांस्कृतिक संवाद आणि जागतिक शांततेचे प्रभावी माध्यम बनवते.

क्रिकेट : राष्ट्रीय सीमांच्या पलीकडची समान भाषा

भारत, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, पाकिस्तान, श्रीलंका, दक्षिण आफ्रिका, बांगलादेश, न्यूझीलंड आणि अफगाणिस्तान यांसह अनेक देशांमध्ये क्रिकेटविषयी प्रचंड उत्साह दिसून येतो. आंतरराष्ट्रीय स्पर्धांमुळे या देशांतील खेळाडू आणि प्रेक्षकांना एक समान अनुभव मिळतो. क्रिकेटमध्ये प्रतिस्पर्धा अपरिहार्य असते; परंतु प्रतिस्पर्धा म्हणजे शत्रुत्व नव्हे. प्रतिस्पर्धी संघाला पराभूत करण्याचा प्रयत्न करतानाही त्याच्या कौशल्याचा आदर करता येतो. आंतरराष्ट्रीय संबंधांच्या दृष्टीनेही हा विचार महत्त्वाचा आहे.

विविध देशांतील खेळाडू एकत्र सराव करतात, परस्परांच्या अनुभवांतून शिकतात आणि मैदानाबाहेर मैत्रीचे संबंध निर्माण करतात, तेव्हा त्यांच्यात सांस्कृतिक समज वाढते. राष्ट्रीय अस्मितेचा अभिमान आणि जागतिक बंधुभाव या परस्परविरोधी गोष्टी नाहीत, हा संदेश क्रिकेटमधून मिळतो.

भारत-पाकिस्तान क्रिकेट : प्रतिस्पर्धेतून सद्भावनेची संधी

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंध ऐतिहासिक, राजकीय आणि सुरक्षाविषयक आव्हानांनी प्रभावित झाले आहेत. असे असले, तरी या दोन्ही देशांतील क्रिकेट सामने कोट्यवधी लोकांच्या भावनांशी जोडलेले आहेत. अशा सामन्यांमध्ये विजयाची अपेक्षा असणे स्वाभाविक आहे. मात्र, खेळाचा उद्देश कोणत्याही देशाविषयी किंवा तेथील नागरिकांविषयी द्वेष निर्माण करणे हा असू नये. खेळाडू एकमेकांच्या उत्कृष्ट कामगिरीचे कौतुक करतात, कठीण परिस्थितीत खिलाडूवृत्ती जपतात आणि सामन्यानंतर परस्परांचा सन्मान करतात, तेव्हा त्यांचे वर्तन सकारात्मक संदेश देते.

क्रिकेट स्वतःहून राजकीय वाद संपवू शकत नाही. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मतभेदांचे निराकरण व्यापक संवाद, विश्वास आणि राजनैतिक प्रयत्नांतूनच शक्य आहे. तथापि, खेळ परस्पर संपर्क आणि सद्भावनेच्या शक्यता जिवंत ठेवू शकतो. त्यामुळे भारत-पाकिस्तान क्रिकेटकडे केवळ विजय-पराजयाच्या दृष्टिकोनातून न पाहता संयम, परस्पर सन्मान आणि मानवी संबंधांच्या संदर्भातही पाहिले पाहिजे. देशप्रेम तेव्हाच सार्थ ठरते, जेव्हा ते आपल्या देशाविषयी अभिमान निर्माण करते; दुसऱ्या देशाविषयी द्वेष नव्हे.

खिलाडूवृत्ती : शांततापूर्ण समाजाचा भक्कम पाया

क्रिकेट खेळाडूंना असे अनेक गुण शिकवते, ज्यांची शांततापूर्ण समाज निर्मितीसाठीही आवश्यकता असते. शिस्त खेळाडूंना नियमांचे पालन करायला शिकवते. संयम कठीण परिस्थितीत विवेक टिकवून ठेवण्याची प्रेरणा देतो. पराभव स्वीकारणे आणि प्रतिस्पर्ध्यांचा यशाचे कौतुक करणे विनम्रता विकसित करते. संघासाठी वैयक्तिक स्वार्थ बाजूला ठेवून योगदान देणे सहकार्याची भावना बळकट करते.

पंचांच्या निर्णयाचा आदर करणे, निष्पक्ष स्पर्धा करणे आणि प्रतिस्पर्धी खेळाडूशी मर्यादित वर्तन ठेवणे या गोष्टी खेळाची विश्वासार्हता टिकवण्यासाठी आवश्यक आहेत. प्रशिक्षक आणि शिक्षकांनी या मूल्यांची सांगड मुलांच्या दैनंदिन जीवनाशी घातली, तर त्यांचा प्रभाव मैदानाबाहेरही दिसून येऊ शकतो. मात्र, केवळ खेळात सहभागी झाल्याने व्यक्तीचे चारित्र्य आपोआप घडते, असे नाही. खिलाडूवृत्ती विकसित करण्यासाठी योग्य प्रशिक्षण, जबाबदार नेतृत्व आणि नैतिक शिक्षणही आवश्यक आहे.

आंतरराष्ट्रीय स्पर्धा : संस्कृती समजून घेण्याची संधी

क्रिकेट विश्वचषक, टी-२० विश्वचषक आणि महिला क्रिकेट विश्वचषक यांसारख्या स्पर्धा विविध देशांना एकत्र आणतात. खेळाडू, क्रीडा अधिकारी, पत्रकार आणि प्रेक्षकांना एकमेकांच्या संस्कृती, परंपरा आणि जीवनशैलीची ओळख करून घेण्याची संधी मिळते. यजमान देशाला आपली सांस्कृतिक विविधता जगासमोर मांडता येते, तर परदेशातून आलेल्या लोकांना तेथील समाज जवळून समजून घेता येतो. अशा स्पर्धांमुळे पर्यटन आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीलाही चालना मिळू शकते.

क्रिकेटमध्ये नवख्या किंवा तुलनेने लहान देशांनी बलाढ्य संघांविरुद्ध मिळवलेले विजयही विशेष महत्त्वाचे असतात. प्रतिभा आणि परिश्रम ही कोणत्याही एका देशाची मक्तेदारी नाही, हे अशा यशातून सिद्ध होते. त्यामुळे उदयोन्मुख देशांतील तरुणांचा आत्मविश्वास वाढतो आणि जागतिक क्रिकेटमध्ये त्यांच्या देशाची ओळख दृढ होते. मात्र, या स्पर्धांचे सकारात्मक परिणाम टिकवून ठेवण्यासाठी आयोजक आणि प्रसारमाध्यमांनी राष्ट्रीय अभिमानाचे रूपांतर आक्रमक राष्ट्रवादात, वंशभेदी टिप्पणींमध्ये किंवा प्रेक्षकांतील वैमनस्यात होणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे.

महिला आणि दिव्यांग क्रिकेट : समानतेचा प्रभावी संदेश

समाजातील प्रत्येक व्यक्तीला सन्मान आणि समान संधी मिळाल्याशिवाय जागतिक शांततेचे स्वप्न पूर्ण होऊ शकत नाही. या दृष्टीने महिला क्रिकेट आणि दिव्यांग क्रिकेटची भूमिका महत्त्वपूर्ण आहे.

महिला क्रिकेटने प्रतिभा, नेतृत्व आणि संघर्षशीलता या गुणांवर कोणत्याही एका लिंगाची मक्तेदारी नसल्याचे सिद्ध केले आहे. महिला खेळाडूंचे यश समाजात समान संधींची आवश्यकता अधोरेखित करते. त्यासाठी ग्रामीण भागातील मुलींना प्रशिक्षण, सुरक्षित क्रीडासुविधा आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील मुलींना आवश्यक मदत उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे दृष्टिहीनांचे क्रिकेट आणि दिव्यांग खेळाडूंच्या अन्य स्पर्धा शारीरिक मर्यादा एखाद्या व्यक्तीची प्रतिभा किंवा जिद्द संपवू शकत नाहीत, हे दाखवून देतात. अशा खेळाडूंना योग्य सुविधा आणि सन्मान देऊन समाज समावेशकतेचा खरा अर्थ समजू शकतो. खेळाच्या मैदानावर जात, धर्म, लिंग, आर्थिक परिस्थिती किंवा शारीरिक क्षमतेपेक्षा प्रतिभा आणि प्रयत्नांना महत्त्व दिले जाते, तेव्हा समानतेची भावना अधिक बळकट होते. शांततापूर्ण समाजनिर्मितीसाठी हाच दृष्टिकोन आवश्यक आहे.

क्रिकेट राजनय : संवादाचे नवे मार्ग

आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये संवाद आणि सहकार्य वाढवण्यासाठी खेळांचा उपयोग केला जातो. क्रिकेट दौरे, मैत्रीपूर्ण सामने, संयुक्त प्रशिक्षण शिबिरे आणि क्रीडा परिषदा यांमुळे विविध देशांतील खेळाडू आणि अधिकारी एकमेकांच्या संपर्कात येतात. अशा संपर्कांमुळे राजकीय मतभेद तातडीने संपत नसले, तरी परस्पर समज वाढण्यास मदत होऊ शकते. खेळाडूंमध्ये निर्माण झालेली मैत्री सामान्य नागरिकांपर्यंतही सकारात्मक संदेश पोहोचवू शकते. यासाठी क्रिकेट मंडळे, आंतरराष्ट्रीय क्रीडा संस्था आणि सरकारांनी खेळाचे स्वातंत्र्य, खेळाडूंची सुरक्षितता आणि निष्पक्षता यांना प्राधान्य दिले पाहिजे. क्रिकेटचा वापर केवळ राजकीय प्रसिद्धी किंवा व्यावसायिक फायद्यासाठी न करता संवाद, सद्भावना आणि सहकार्य वाढवण्यासाठीही केला पाहिजे.

युवा पिढी आणि क्रिकेट पत्रकारितेची जबाबदारी

युवा पिढी ही कोणत्याही देशाच्या भविष्याचा आधार असते. लहानपणापासूनच तरुणांमध्ये शिस्त, सहकार्य, सहिष्णुता आणि निष्पक्ष स्पर्धेचे महत्त्व रुजवले, तर ते समाजात सकारात्मक परिवर्तन घडवू शकतात. शाळा, महाविद्यालये आणि ग्रामीण भागांत क्रिकेट स्पर्धांसोबत शांतता, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक सेवेविषयी उपक्रम राबवता येतील. आर्थिकदृष्ट्या दुर्बल मुलांना विनामूल्य प्रशिक्षण आणि क्रीडासाहित्य उपलब्ध करून देणेही या दिशेने उपयुक्त ठरेल. या प्रक्रियेत क्रिकेट पत्रकारितेची जबाबदारीही महत्त्वाची आहे. वृत्तपत्रे, आकाशवाणी, दूरचित्रवाणी आणि डिजिटल माध्यमांनी केवळ धावा, बळी आणि विक्रम यांची माहिती देण्यापुरते मर्यादित राहू नये. खेळाडूंचा संघर्ष, खिलाडूवृत्ती, महिला क्रिकेट, दिव्यांग खेळाडूंचे यश आणि सामाजिक योगदान यांनाही योग्य प्रसिद्धी मिळाली पाहिजे. याउलट, अपुष्ट बातम्या, वैयक्तिक अपमान आणि सनसनाटी वादांना अवाजवी महत्त्व दिल्यास क्रिकेटच्या सकारात्मक प्रभावाला बाधा पोहोचू शकते. पत्रकार आणि क्रिकेट समीक्षकांनी तथ्याधारित, संतुलित आणि जबाबदार भाषेचा वापर करणे आवश्यक आहे. त्यांच्या लेखणीतून सामाजिक सलोखा आणि मानवी मूल्यांची जपणूक होऊ शकते.

पर्यावरण संवर्धन : मानवतेच्या सामायिक भविष्याची काळजी

शांतता म्हणजे केवळ युद्धाचा अभाव नव्हे. स्वच्छ पर्यावरण, नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण आणि भावी पिढ्यांसाठी सुरक्षित भविष्य या गोष्टीही शांततेच्या व्यापक संकल्पनेशी संबंधित आहेत. क्रिकेटची मोठी मैदाने आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धा यांमध्ये पाणी, ऊर्जा आणि इतर संसाधनांचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. त्यामुळे क्रिकेट संस्थांनी जलसंवर्धन, प्लास्टिकचा वापर कमी करणे, कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन आणि पर्यावरणपूरक ऊर्जेला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. खेळाडू आणि क्रीडा संघटना वृक्षारोपण, स्वच्छता मोहीम आणि पर्यावरण जागृती कार्यक्रमांद्वारे समाजाला प्रेरणा देऊ शकतात. स्थानिक क्रिकेट स्पर्धांमध्येही पर्यावरणविषयक जबाबदारीला महत्त्व देता येईल. पृथ्वी ही कोणत्याही एका देशाची मालमत्ता नसून संपूर्ण मानवजातीचा सामायिक वारसा आहे. तिचे संरक्षण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य आवश्यक आहे. क्रिकेट या सामायिक जबाबदारीचा संदेश लाखो लोकांपर्यंत पोहोचवू शकते. क्रिकेटच्या माध्यमातून शांततेला चालना देण्यासाठी उपाययोजना क्रिकेटच्या माध्यमातून जागतिक शांततेला प्रोत्साहन देण्यासाठी काही ठोस पावले उचलता येतील.

१. विविध देशांतील तरुणांसाठी मैत्रीपूर्ण क्रिकेट स्पर्धा आणि संयुक्त प्रशिक्षण शिबिरे आयोजित करावीत. २. शाळा व महाविद्यालयांमध्ये खिलाडूवृत्ती, अहिंसा, समानता आणि परस्पर सन्मान यांवर आधारित उपक्रम राबवावेत. ३. महिला आणि दिव्यांग क्रिकेटला पुरेशा सुविधा, आर्थिक साहाय्य आणि व्यापक प्रसिद्धी द्यावी. ४. आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये वंशभेद, भेदभाव आणि द्वेषपूर्ण वर्तनाविरुद्ध प्रभावी कारवाई करावी. ५. खेळाडूंना शिक्षण, पर्यावरण संवर्धन आणि मानवतावादी सेवेशी संबंधित उपक्रमांत सहभागी होण्यासाठी संधी द्याव्या. ६. क्रिकेट पत्रकारितेत जबाबदार वृत्तांकन आणि सकारात्मक सामाजिक संदेशांना प्रोत्साहन द्यावे.

७. आर्थिकदृष्ट्या दुर्बल मुलांसाठी प्रशिक्षण, क्रीडासाहित्य आणि पर्यायांमध्ये सहभाग घेण्यासाठी आवश्यक मदत उपलब्ध करून द्यावी. या उपाययोजनांमुळे क्रिकेटचा प्रभाव केवळ मनोरंजन आणि व्यावसायिक यशापुरता मर्यादित न राहता सामाजिक जागृती आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढवण्यासही मदत होईल.

निष्कर्ष : मैदानावर खिलाडूवृत्ती, जगात शांतता!

क्रिकेटच्या प्रत्येक सामन्याचा निकाल विजय किंवा पराभवाच्या रूपात लागतो. मात्र, मानवतेच्या व्यापक संदर्भात खरी उपलब्धी तीच असते, ज्यामध्ये प्रतिस्पर्धा असूनही परस्पर सन्मान टिकून राहतो आणि मतभेदांमध्येही संवादाचे मार्ग खुले राहतात. क्रिकेट एकट्याने युद्धे संपवू शकत नाही किंवा सर्व राजकीय वादांचे निराकरण करू शकत नाही, हे वास्तव स्वीकारले पाहिजे. त्यासाठी न्याय्य धोरणे, शिक्षण, राजनैतिक संवाद आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य आवश्यक आहे. तरीही, लोकांमधील विश्वास वाढवणे, पूर्वग्रह कमी करणे आणि सहकार्याची संस्कृती विकसित करणे यांत क्रिकेट महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकते. आज गरज आहे ती क्रिकेटला केवळ पैसा, प्रसिद्धी, विक्रम आणि विजयाच्या स्पर्धेपुरते मर्यादित न ठेवण्याची. सामाजिक समरसता, समान संधी, पर्यावरण संवर्धन आणि विश्वबंधुत्व यांच्याशी त्याची सांगड घालणे आवश्यक आहे.

क्रिकेटमधील सर्वांत मोठा विजय तो नव्हे, ज्यामध्ये एक देश दुसऱ्या देशाला पराभूत करतो; तर तो आहे, ज्यामध्ये खेळाच्या माध्यमातून दोन देशांतील लोक एकमेकांना समजून घेणे, स्वीकारणे आणि परस्परांचा सन्मान करणे शिकतात. जेव्हा मैदानावर प्रतिस्पर्ध्यांचा आदर केला जातो, मुले भेदभाव विसरून एकत्र खेळतात आणि खेळाडू आपल्या प्रसिद्धीचा उपयोग मानवतेच्या सेवेसाठी करतात, तेव्हा क्रिकेट जागतिक शांततेच्या दिशेने अर्थपूर्ण योगदान देते. चला, क्रिकेटकडे केवळ बॅट आणि चेंडूचा खेळ म्हणून न पाहता प्रेम, सद्भावना, सहकार्य आणि मानवतेचा संदेश जगभर पोहोचवणारे प्रभावी माध्यम म्हणून पाहूया. कारण खेळाचा खरा उद्देश केवळ प्रतिस्पर्ध्यांना पराभूत करणे नसून, माणसामाणसांतील अंतर कमी करणे हाही आहे. मैदानावर जेव्हा खिलाडूवृत्ती जिंकते, तेव्हा मानवता जिंकते; आणि मानवता जिंकते, तेव्हाच जागतिक शांततेच्या स्वप्नपूर्तीच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल पडते.

– ९०९६३७२०८२

डॉ. दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

बँकिंग संकट ते सत्तांतर : पराग्वेने दिलेला जगाला गंभीर इशारा

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

दक्षिण अमेरिका खंडातील पराग्वे या देशात अलीकडेच एक अभूतपूर्व आर्थिक आणि राजकीय पेचप्रसंग निर्माण झाला आहे. एका मोठ्या आणि वेगाने वाढणाऱ्या बँकेच्या अचानक बुडण्यामुळे केवळ सामान्य जनतेचे कोट्यवधी रुपयेच अडकले नाहीत, तर या प्रकरणाच्या थेट परिणामामुळे देशाच्या सर्वोच्च नेत्यालाच आपली खुर्चीही गमवावी लागली आहे. भ्रष्टाचार, पैशांचा गैरवापर आणि राजकीय दबावामुळे देशाची संपूर्ण अर्थव्यवस्था कशी डळमळीत होऊ शकते, याचे हे एक अत्यंत गंभीर आणि जिवंत उदाहरण संपूर्ण जगासमोर उभे राहिले आहे.

या संपूर्ण प्रकरणाची सुरुवात देशातील ५ व्या क्रमांकाची सर्वात मोठी आणि लोकप्रिय असणाऱ्या यूएनए बँकेच्या अचानक कोसळण्याने झाली. ही बँक प्रामुख्याने डिजिटल बँक म्हणून वेगाने उदयास आली होती. नोव्हेंबर २०२६ च्या पहिल्या आठवड्यात जेव्हा ही बँक अचानक दिवाळखोरीत निघाली, तेव्हा देशात एकच हाहाकार उडाला. या एका झटक्यामुळे परागवेच्या सुमारे ३० लाख ग्राहकांचे बँक खाते आणि कार्ड रातोरात गोठवले गेले. देशाच्या जवळपास निम्म्या लोकसंख्येचे पैसे या बँकेत अडकले होते. लोकांना आपलेच कष्टाचे पैसे काढता येत नव्हते किंवा कोणताही डिजिटल व्यवहार करता येत नव्हता. त्यामुळे संतप्त झालेली जनता रस्त्यावर उतरली आणि राजधानी असुनसिओन शहरात संसदेच्या बाहेर ऐतिहासिक जनक्षोभ उसळला.

या भीषण आर्थिक संकटाची पाळेमुळे थेट सरकारच्या सर्वोच्च स्तरापर्यंत पोहोचलेली होती. या बँकेच्या पतनामागचे मुख्य कारण म्हणजे सत्ताधाऱ्यांचा भ्रष्ट हस्तक्षेप. तत्कालीन राष्ट्रपती सँटियागो पेना यांच्यावर असे गंभीर आरोप ठेवण्यात आले की, त्यांनी आपल्या पदाचा आणि अधिकारांचा गैरवापर करून जनतेचा पैसा तसेच राज्याचा पेन्शन निधी याच यूएनए बँकेत जमा करण्यासाठी मोठा राजकीय दबाव आणला होता. दुसरीकडे, बँकेचे व्यवस्थापन बेकायदेशीररित्या स्वतःच्याच जवळच्या व्यक्तींना आणि कंपन्यांना भरमसाठ कर्ज वाटत होते. मध्यवर्ती बँक आणि नियामक संस्थांनी या सर्व भयंकर गैरप्रकारांकडे जाणूनबुजून डोळेझाक केली, कारण त्यांच्यावर थेट राष्ट्रपतींचा दबाव होता.

बँकेचे बिंग फुटल्यानंतर आणि लोकांचा रोष अनावर झाल्यानंतर, देशाच्या राजकारणात मोठे वादळ निर्माण झाले. जनतेच्या असंतोषाची दखल घेत संसदेच्या वरिष्ठ सभागृहाने म्हणजेच सिनेटने तातडीने पावले उचलत तत्कालीन राष्ट्रपती सँटियागो पेना यांच्यावर महाभियोग चालवला. अतिशय वेगाने घडलेल्या या राजकीय घडामोडींमध्ये संसदेने सर्वसंमतीने त्यांना पदावरून बडतर्फ केले. एवढेच नव्हे, तर पदावरून हटवल्यानंतर लगेचच त्यांना त्यांच्याच घरात नजरकैदेत ठेवण्यात आले आणि त्यांच्यावरील आर्थिक गैरव्यवहारांची सखोल चौकशी सुरू करण्यात आली. अवघ्या काही दिवसांत घडलेल्या या अभूतपूर्व सत्तांतराला अनेक जण एक प्रकारचा उठाव किंवा राजकीय क्रांती म्हणून पाहत आहेत.

राष्ट्रपतींना पदच्युत केल्यानंतर देशाची सूत्रे तत्कालीन उपराष्ट्रपती पेड्रो अलियाना यांच्या हाती सोपवण्यात आली. ५२ वर्षीय पेड्रो अलियाना यांनी देशाचे ५३ वे राष्ट्रपती म्हणून शपथ घेतली असून, त्यांचा हा कार्यकाळ वर्ष २०२८ पर्यंत असणार आहे. सध्या या संपूर्ण बँक घोटाळ्याची अतिशय कसून चौकशी सुरू आहे. बँकेचे संस्थापक मिगुएल वाझक्वेज यांच्यासह एकूण २७ जणांवर फसवणूक आणि विश्वासाला तडा दिल्याचा ठपका ठेवत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, तसेच बँकेच्या अनेक माजी संचालकांना ताब्यात घेण्यात आले आहे. आता नवीन राष्ट्रपतींसमोर सर्वात मोठे आणि खडतर आव्हान आहे ते म्हणजे, बँकिंग व्यवस्थेवरील जनतेचा उडालेला विश्वास पुन्हा संपादन करणे आणि सुमारे ३० लाख सामान्य नागरिकांचे अडकलेले पैसे त्यांना सुरक्षितपणे परत मिळवून देऊन देशाला या संकटातून बाहेर काढणे.

पराग्वेमधील बँकिंग संकट आणि त्यातून उद्भवलेली राजकीय उलथापालथ ही केवळ एका देशाची अंतर्गत घटना म्हणून पाहता येणार नाही. ही घटना भारतासह जगातील सर्व लोकशाही आणि विकसनशील राष्ट्रांसाठी एक गंभीर इशारा आहे. बँकिंग व्यवस्था ही कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेचा आणि नागरिकांच्या विश्वासाचा कणा असते. या व्यवस्थेत राजकीय हस्तक्षेप, भ्रष्टाचार, पक्षपात आणि नियामक संस्थांची निष्क्रियता शिरली, तर त्याचे परिणाम केवळ आर्थिक नुकसानापुरते मर्यादित राहत नाहीत; ते संपूर्ण राजकीय आणि सामाजिक व्यवस्थेलाही हादरवू शकतात.

भारताच्या संदर्भात या घटनेतून विशेष धडा घेण्याची आवश्यकता आहे. देशातील बँका, वित्तीय संस्था, सहकारी बँका आणि डिजिटल वित्तीय व्यवस्था या केवळ आर्थिक संस्थाच नसून कोट्यवधी नागरिकांच्या आयुष्यभराच्या कष्टाची आणि बचतीची संरक्षक आहेत. त्यामुळे या संस्थांमध्ये पारदर्शकता, जबाबदारी आणि सक्षम नियमन अत्यावश्यक आहे. कोणत्याही राजकीय किंवा प्रभावशाली व्यक्तीच्या दबावाखाली बँकिंग निर्णय घेतले जाऊ नयेत आणि नियामक संस्थांनी पूर्ण स्वायत्तता व निष्पक्षतेने कार्य केले पाहिजे.

विशेषतः भारतात डिजिटल बँकिंग, ऑनलाइन व्यवहार आणि तंत्रज्ञानाधारित आर्थिक सेवा वेगाने विस्तारत असताना सायबर सुरक्षा, ग्राहकांचा ठेवींचे संरक्षण आणि वित्तीय संस्थांवरील प्रभावी देखरेख यांना सर्वोच्च प्राधान्य द्यावे लागेल. सामान्य नागरिकांचा बँकिंग व्यवस्थेवरील विश्वास हा देशाच्या आर्थिक स्थैर्याचा अत्यंत महत्त्वाचा आधार आहे. हा विश्वास एकदा डळमळीत झाला, तर त्याचे दूरगामी परिणाम संपूर्ण अर्थव्यवस्थेवर होऊ शकतात.

परागवेची घटना अखेरीस एक मूलभूत सत्य अधोरेखित करते– लोकशाहीत सत्ता कितीही शक्तिशाली असली, तरी ती जनतेच्या विश्वासापेक्षा मोठी असू शकत नाही. आर्थिक संस्थांचा गैरवापर, जनतेच्या पैशांशी खेळ आणि सत्तेचा हस्तक्षेप यावर वेळीच नियंत्रण ठेवणे हीच मजबूत लोकशाहीची खरी ओळख आहे. भारतानेही या घटनांकडे केवळ परदेशातील राजकीय नाट्य म्हणून न पाहता, सुदृढ, पारदर्शक, स्वायत्त आणि जनहिताभिमुख आर्थिक व्यवस्थेच्या उभारणीसाठी एक महत्त्वपूर्ण धडा म्हणून पाहण्याची गरज आहे.

– ९५६१५९४३०६

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ – मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com / ई-पेपर : epaper.sinhvani.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

बिरसा मुंडा जयंती सप्ताहातून आदिवासी समाजाच्या सक्षमीकरणाला नवी दिशा

पंतप्रधान नरेंद्र मोदी ऑनलाइन माध्यमातून उपस्थित राहणार, १५ डिसेंबरपर्यंत सर्व आदिवासींना मालकीचे प्रॉपर्टी कार्ड देणार : चंद्रशेखर बावनकुळे

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त केंद्र आणि राज्य सरकारच्या वतीने ११ ते १८ नोव्हेंबरदरम्यान जनजातीय गौरव सप्ताह साजरा करण्यात येत आहे. या सप्ताहाच्या माध्यमातून भगवान बिरसा मुंडा यांचे जीवनकार्य, त्यांचा संघर्ष, त्यांचे विचार आणि आदिवासी समाजाच्या उत्थानासाठी त्यांनी दिलेला लढा देशभर पोहोचविण्यात येणार आहे. आदिवासी समाजाला सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी हा सप्ताह प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास महसूलमंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला.



महसूल आणि अमरावती आणि नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी प्रसार माध्यमांशी संवाद साधला.

या सप्ताहाचा मुख्य कार्यक्रम १५ नोव्हेंबर रोजी गडचिरोली येथे आयोजित करण्यात आला असून, या कार्यक्रमाला देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी ऑनलाइन माध्यमातून उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या ऑनलाइन उपस्थितीत होणाऱ्या या कार्यक्रमाचे देशभर थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाचे देशभर ऑनलाइन माध्यमातून प्रसारण करणार आहेत. राज्यपाल, मुख्यमंत्री, मंत्रिमंडळातील सदस्य, आदिवासी समाजासाठी कार्य करणारे लोकप्रतिनिधी आणि चार जिल्ह्यांतील आदिवासी बांधव या कार्यक्रमात सहभागी होतील. आदिवासी विकासमंत्री अशोक उईके यांनी या कार्यक्रमाचे उत्तम नियोजन केले असल्याचेही बावनकुळे यांनी सांगितले.

१५ डिसेंबरपर्यंत आदिवासींना मालकी हक्काचे प्रॉपर्टी कार्ड

आदिवासी समाजाला जमिनीचा मालकी हक्क मिळवून देण्यासाठी महसूल विभागाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून ज्या जमिनीवर आदिवासी बांधव शेती करीत आहेत, त्या जमिनींचे मालकी हक्काचे दस्तऐवज त्यांच्याकडे नव्हते. त्यामुळे अनेक शासकीय योजनांपासून त्यांना वंचित राहावे लागत होते. आता राज्य सरकारने अशा आदिवासी बांधवांना वनपट्टे आणि मालकी हक्काचे प्रॉपर्टी कार्ड देण्याचा निर्णय घेतला आहे.

पालघर जिल्ह्यात आदिवासी शेतकऱ्यांना सर्वसामान्य शेतकऱ्यांप्रमाणे सातबारा उतारे देण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. राज्यातील संपूर्ण आदिवासी बांधवांना १५ डिसेंबरपर्यंत त्यांच्या जमिनीचे मालकी हक्काचे प्रॉपर्टी कार्ड देण्याचा आमचा संकल्प आहे. त्याचप्रमाणे १ जानेवारी २०११ पूर्वीपर्यंत ज्या जागेवर आदिवासी बांधवांनी घरे बांधली आहेत, त्यांनाही घरांचे मालकी हक्क देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. आदिवासी समाजातील प्रत्येक कुटुंबाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणून देशाच्या प्रगतीत त्यांना महत्त्वाचे स्थान मिळवून देण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे, असे बावनकुळे म्हणाले.

आदिवासी समाजाला भडकविण्याचे विरोधकांचे प्रयत्न

जनजातीय गौरव सप्ताहाच्या माध्यमातून आदिवासी समाजाच्या विकासासाठी सरकार कटिबद्ध असल्याचा संदेश दिला जात आहे. मात्र, विरोधक आदिवासी समाजामध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. आदिवासी समाजाच्या सुविधा काढून घेतल्या जाणार असल्याचे सांगून त्यांना भडकविण्याचे काम केले जात आहे. प्रत्यक्षात सरकार आदिवासी समाजाला अधिक सक्षम करण्यासाठी विविध योजना राबवीत असल्याचे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

सर्वोच्च न्यायालयाच्या वाळू उत्खननाच्या निर्णयाचा अभ्यास करणार

नदीपात्रातील वाळू उत्खनन कमी करून कृत्रिम वाळू अर्थात एम-सँडकडे वळण्याचा कार्यक्रम राज्य सरकारने यापूर्वीच हाती घेतला आहे. सर्वोच्च न्यायालयाने वाळू उत्खननासंदर्भात दिलेल्या निर्णयाचा अभ्यास करून त्यानुसार पुढील भूमिका निश्चित केली जाईल, असे बावनकुळे यांनी सांगितले.

सोनिया गांधींच्या पुस्तकातून जनतेत संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न

सोनिया गांधी यांच्या पुस्तकातील भाजपविषयीच्या उल्लेखांवर प्रतिक्रिया देताना बावनकुळे म्हणाले की, सोनिया गांधी या काँग्रेस पक्षाच्या अध्यक्ष राहिल्या आहेत. त्यामुळे त्या भाजप आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी सकारात्मक लिहिणार नाहीत, हे स्वाभाविक आहे. स्वतःच्या कर्तृत्वावर जनतेसमोर जाण्याऐवजी पुस्तकांच्या माध्यमातून संभ्रम निर्माण करून काही दिवस बातम्यांमध्ये राहण्याची काँग्रेसची जुनी पद्धत आहे.

देशातील १४० कोटी जनतेला काँग्रेसने आणि तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी आणीबाणीच्या काळात लोकशाही व नागरिकांच्या स्वातंत्र्याची कशी गळचेपी केली, हे माहीत आहे. नागरिकांचे बोलण्याचे, जगण्याचे आणि अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य हिरावून घेण्यात आले होते. त्या काळातील चुकीच्या निर्णयांची जबाबदारी टाळण्यासाठी आणि २०२९ च्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जनतेमध्ये संभ्रम निर्माण करण्यासाठी पुस्तकाचा वापर केला जात आहे.

या पुस्तकातील मुद्द्यांचे छोटे-छोटे व्हिडिओ, ग्राफिक्स तयार करून वेगवेगळ्या समाजघटकांमध्ये पाठविण्याचा प्रयत्न होऊ शकतो. मात्र, देशातील जनता विकसित भारताच्या मॉडेलला पसंती देत आहे. आगामी निवडणुकीची तयारी काँग्रेसने या पुस्तकाच्या माध्यमातून सुरू केली आहे, अशी टीका त्यांनी केली.

गोकुळच्या निवडणुकीचे राजकारण संपले; आता दूध उत्पादकांच्या हिताचा विचार करा

कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ अर्थात गोकुळच्या राजकारणावर बोलताना बावनकुळे म्हणाले की, गोकुळच्या निवडणुकीचे राजकारण आता संपले आहे. साडेपाच लाख दूध उत्पादक शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन दूध उत्पादकांना अधिक चांगला दर कसा मिळेल आणि गोकुळची प्रगती कशी होईल, यावर विचार करण्याची वेळ आली आहे.

गोकुळ ही महाराष्ट्रातील एक महत्त्वाची आणि मजबूत सहकारी संस्था आहे. त्यामुळे पक्षीय राजकारण बाजूला ठेवून सर्व संचालकांनी एकत्रितपणे संस्थेच्या उन्नतीसाठी काम केले पाहिजे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचीही गोकुळची प्रगती व्हावी, अशी भूमिका आहे. त्यामुळे सर्वांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून दूध उत्पादकांच्या हिताचे निर्णय घ्यावेत, असे आवाहन त्यांनी केले.

संजय राऊत यांच्या वक्तव्याच्या रोखठी उलट परिस्थिती

राष्ट्रवादी काँग्रेसच्या राजकीय भूमिकेबाबत संजय राऊत यांनी केलेल्या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना बावनकुळे म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेसबाबत मला फारशी माहिती नाही. त्यांच्या पक्षाचा निर्णय त्यांनी घ्यायचा आहे, असेही ते म्हणाले.

थोडक्यात

ग्रामपंचायत पोटाचे माजी सरपंच आनंदराव भड यांचे निधन

दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा

ग्रामपंचायत पोटाचे माजी सरपंच श्री. आनंदराव जयरामजी भड (पाटील) (वय ७८) यांचे बुधवार, दिनांक ११ नोव्हेंबर २०२६ रोजी आजाराने दुःखद निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा गुरुवार, दिनांक १२ नोव्हेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता त्यांच्या राहत्या घरून निघून खामला येथील मोक्षधाम सहकार नगर स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात येतील. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून व नातवंडे असा परिवार आहे.



लाल मातीतून साकारला भव्य 'किल्ला प्रतापगड', छत्रपती शिवरायांच्या पराक्रमाचा इतिहास जिवंत!



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

किल्ला प्रतापगड हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या अफाट शौर्य, बुद्धिमत्ता आणि रणनीतीचे प्रतीक आहे. १० नोव्हेंबर १६५९ रोजी याच प्रतापगडाच्या पायथ्याशी शिवरायांनी अफाट सैन्य आणि शक्तीचा गर्व असलेल्या अफझलखानाचा पराभव करून मराठा साम्राज्याच्या स्वाभिमानाचा झेंडा रोवला होता. शिवरायांच्या याच पराक्रमी इतिहासाची आणि गड-किल्ल्यांच्या परंपरेची प्रेरणा घेत रामकृष्ण नगर, उमरेड रोड, दिघोरी येथील श्री वीर हनुमान सेवा समितीतर्फे श्री वीर हनुमान मंदिर परिसरात भव्यदिव्य अशा लाल मातीपासून बनवलेल्या 'किल्ला प्रतापगड'ची देखणी उभारणी करण्यात आली आहे. या ऐतिहासिक व अप्रतिम किल्ल्याचा भव्य अनावरण सोहळा नुकताच उत्साहात पार पडला. याप्रसंगी प्रभागाचे नगरसेवक पिंटू झलके, हिंदू एकता प्रतिष्ठानचे अध्यक्ष स्वप्नील साळुंखे, भारतीय जनता युवा मोर्चा महाराष्ट्र सचिव अमर धरमारे तसेच भाजपचे ज्येष्ठ नेते सुरेश सवई यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. उपस्थित मान्यवरांनी व नागरिकांनी बाल मावळ्यांच्या कलागुणांचे, कष्टाचे आणि सांस्कृतिक जपणुकीचे भरभरून कौतुक केले.

सदरील किल्ल्याच्या निर्मितीसाठी मार्गदर्शक सुरज वैद्य यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच किल्ला उभारणीत बाल मावळे मृदुल देशमुख, स्मित भुते, पारस दाते, स्वराज कुथे आणि हार्दिक सोनटक्के यांनी अत्यंत उत्साहाने व मेहनतीने सहकार्य करून हा भव्य किल्ला पूर्णत्वास नेला. हा अप्रतिम किल्ला व शिवरायांच्या इतिहासाची प्रचिती देणारी ही कलाकृती नागरिकांना पाहण्यासाठी दररोज सायंकाळी ०६:०० ते रात्री ०९:०० या वेळेत उघडी राहणार आहे. परिसरातील नागरिकांनी व बालगोपाळांनी या किल्ल्यालाला अवश्य भेट द्यावी, असे आवाहन श्री वीर हनुमान सेवा समितीतर्फे करण्यात आले आहे.

पेंच नदीत अवैध वाळू उत्खननाचा पर्दाफाश! वाळूने भरलेला ट्रॅक्टर-ट्रॉली पोलिसांकडून जप्त, चालक व मालकाविरुद्ध गुन्हा दाखल

दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी

पेंच नदीपात्रातून सुरू असलेल्या अवैध वाळू उत्खनन आणि वाहतुकीविरोधात पारशिवनी पोलिसांनी कारवाई करीत वाळूने भरलेला ट्रॅक्टर-ट्रॉली जप्त केला. या कारवाईत वाहनासह अवैध वाळू असा एकूण ३ लाख ७६ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला. याप्रकरणी ट्रॅक्टर चालक व मालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी सकाळी पोलीस उपनिरीक्षक विठ्ठल सूर्यवंशी हे परिसरात गस्तीवर होते. यावेळी नवेगाव खैरी शिवारातील पेंच नदीजवळ एक महिंद्रा ट्रॅक्टर व ट्रॉली संशयास्पद स्थितीत आढळून आली. पोलिसांनी वाहन थांबवून तपासणी केली असता ट्रॉलीमध्ये वाळू भरलेली असल्याचे दिसून आले. चौकशीदरम्यान ही वाळू पेंच नदीपात्रातून कोणत्याही वैध रॉयल्टी किंवा परवानगीशिवाय उत्खनन करून वाहतूक केली जात असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर पोलिसांनी पंचनामा करून ट्रॅक्टर क्रमांक एमएच ४० डीई २८४८ आणि ट्रॉली क्रमांक एमएच ४० एल ८८०२ जप्त केली.

जप्त केलेल्या ट्रॅक्टर-ट्रॉलीची किंमत ३ लाख ७० हजार रुपये, तर अवैध वाळूची किंमत ६ हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले. अशा प्रकारे एकूण ३ लाख ७६ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. या प्रकरणी ट्रॅक्टर चालक व मालक संदीप दशरथ घोटे (वय २८, रा. कोंडासावळी, ता. पारशिवनी) याच्याविरुद्ध संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर शेरकी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार देवानंद उकेबोद्रे पुढील तपास करीत आहेत. पेंच नदीपात्रातील अवैध वाळू उत्खनन आणि वाहतुकीवर पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

'महापौर चषक' क्रिकेट स्पर्धेत महापौर ११ विजयी!

महापौर ११ संघाची कु. मानसी पांडे सामनावीर आणि मालिकावीर



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महिलांना क्रीडा क्षेत्रात समान संधी उपलब्ध करून देणे, त्यांच्या क्रीडागुणांना वाव देणे आणि उच्च स्तरावर खेळण्याची संधी मिळवी, या उद्देशाने नागपूर महानगरपालिकेच्या महापौर श्रीमती निता ठाकरे यांच्या पुढाकारातून महिला खेळाडूंसाठी 'महापौर चषक' टी-२० क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यशवंत स्टेडियम येथे पार पडलेल्या या स्पर्धेत महापौर ११ संघाने अंतिम सामन्यात विजय मिळवत जेतेपद पटकावले. मध्य नागपूरचे आमदार प्रवीण दटके यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

याप्रसंगी धरमपेठ झोन सभापती धनश्री देशपांडे, नगरसेवक सुनील हिरणवार, नगरसेविका पूजा पाठक, क्रीडा अधिकारी डॉ. पीयूष आंबुलकर, जितेंद्र गायकवाड, श्री. शिदे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या स्पर्धेत शहरातील ८ संघांच्या एकूण १२० महिला खेळाडूंनी सहभाग घेतला. संघांची अ आणि ब अशा दोन गटांत विभागणी करण्यात आली होती. अंतिम सामन्यात महापौर ११ संघाने प्रथम फलंदाजी करताना कर्णधार कु. मानसी पांडे हिच्या ४८ चेंडूंतील नाबाद ९३ धावांच्या जोरावर २० षटकांत ५ गडी गमावून १८२ धावा केल्या. प्रत्युत्तरात एम. एच. सी. सी. मास्टर ११ संघाला कु. अंकिता भोंगाडे हिच्या ५४ चेंडूंतील ९१ धावांनंतरही २० षटकांत ८ गडी गमावून १६५ धावाच करता आल्या. त्यामुळे महापौर ११ संघाने १७ धावांनी विजय मिळवत जेतेपद पटकावले.

गोलंदाजीत महापौर ११ संघाच्या अदिती पालांदूरकरने ४ षटकांत २४ धावा देत ४ गडी बाद करून प्रतिस्पर्धी संघाला मोठा धक्का दिला. खुशी जंजाळने २, रुक्साार अंसारी आणि खुशी भगतने प्रत्येकी १ गडी बाद केला. एम. एच. सी. सी. मास्टर ११ संघाकडून सिद्धी नेरकर, मुस्कान ठाकूर आणि रितिका ठाकूर यांनी प्रत्येकी १ गडी बाद केला. तसेच अंकिता भोंगाडे, देव हिरापुरे आणि सिद्धी नेरकर यांच्या चपळ क्षेत्ररक्षणामुळे प्रतिस्पर्धी संघाचे दोन खेळाडू धावबाद झाले.

बक्षीस वितरण समारंभात आमदार श्री. प्रवीण दटके यांनी महिला खेळाडूंना क्रीडा क्षेत्रात व्यासपीठ व संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेचे कौतुक केले. भविष्यातही अशा स्पर्धांच्या माध्यमातून महिला खेळाडूंना प्रोत्साहन देण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

विजयी संघास रोख पारितोषिके

विजेत्या महापौर ११ संघास जेतेपदाचा चषक व १ लाख रुपयांचे रोख पारितोषिक, तर उपविजेत्या एम. एच. सी. सी. मास्टर ११ संघास ५१ हजार रुपयांचे रोख पारितोषिक प्रदान करण्यात आले. महापौर ११ संघाची कु. मानसी पांडे सामनावीर आणि मालिकावीर ठरली.

पारडसिंगा परिसरात दोन बिबट्यांच्या पाऊलखुणा आढळल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंता!

काटोल वन विभागाच्या पथकाकडून शेतांची प्रत्यक्ष पाहणी; शेतकऱ्यांना सावधगिरी बाळगण्याच्या सूचना



दै. सिंहवाणी वृत्त, काटोल

पारडसिंगा उपवनक्षेत्रांतर्गत मौजा पारडसिंगा येथे शेत सर्वे क्रमांक २२४ मधील दिलीप शेषरावजी वरोकर (रा. पारडसिंगा) यांच्या शेतामध्ये तसेच लगतच्या शेतांमध्ये बिबट या वन्यप्राण्याच्या पाऊलखुणा आढळून आल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. सदर पाऊलखुणांची माहिती मिळताच शेतकऱ्यांनी वन विभागाला याबाबत कळविले. त्यानुसार वन विभागाचे पारडसिंगा येथील राउंड ऑफिसर . पी. जी. गंधारे यांनी आपल्या अधिनस्त वनरक्षक लतेश रेवतकर व रूपचंद सोमकुवर यांच्यासह संबंधित शेतांमध्ये प्रत्यक्ष भेट देऊन पाऊलखुणांची पाहणी केली. पाहणीदरम्यान आढळलेल्या पाऊलखुणा दोन बिबट्यांचा असल्याची पुष्टी राउंड ऑफिसर पी. जी. गंधारे यांनी केली. वावेळी शेतालगतचे कास्तकार टिंकू शेख, राहुल वेवले, रमेश खंडाईत, रमेश वरोकर, सिद्धार्थ सोमकुवर, अंशुल वेवले, तुषार खंडाईत, सुभाष वरोकर, गौरव वरोकर, हिमांशू खरबडे व प्रणव खरबडे यांना वन विभागाच्या पथकाने मार्गदर्शन केले.

शेतकऱ्यांनी शेतात काम करताना विशेष सावधगिरी बाळगावी, तसेच बिबट्याच्या हालचालींपासून सुरक्षित राहण्यासाठी शेतात फटाके फोडून आवाज करावा, अशा सूचना राउंड ऑफिसर पी. जी. गंधारे यांनी दिल्या. बिबट्याचा वावर लक्षात घेता शेतकऱ्यांनी एकट्याने शेतात जाणे टाळावे व विशेष सतर्कता बाळगावी, असेही आवाहन करण्यात आले. वनपरिक्षेत्र अधिकारी काटोल येथील श्री. नारखेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली वन विभागाच्या पथकाने संबंधित कास्तकारांची भेट घेऊन प्रत्यक्ष पाहणी व मार्गदर्शन केले. दोन बिबट्यांच्या पाऊलखुणा आढळल्याने पारडसिंगा परिसरातील शेतकऱ्यांनी सतर्क राहण्याची गरज असून, वन विभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी नारखेडे परिसरातील बिबट्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यास सुरुवात केली आहे.

दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या शेतकऱ्यांच्या मदतीला एकनाथ शिंदे धावले!

शेतकऱ्यांची दिवाळी गोड करण्यासाठी शिवसैनिकांना बांधावर जाऊन मदतीचा हात; राजू हरणे यांच्याकडून शेतकरी व पशुपालकांना दिवाळी शिध्याचे वाटप

दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड

नरखेड तालुक्यात वंदा दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करीत आहेत. निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतीचे झालेले नुकसान, हातात न आलेले पीक, वाढता आर्थिक ताण आणि पशुधनाच्या चाऱ्याचा प्रश्न अशा अनेक अडचणींनी शेतकरी हवालदिल झाले आहेत. अशा कठीण परिस्थितीत शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर दिवाळीचा आनंद फुलावा आणि त्यांच्या कुटुंबीयांची दिवाळी गोड व्हावी, या सामाजिक भावनेतून शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसैनिकांना शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्यासोबत दिवाळी साजरी करण्याचे आवाहन केले होते.



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या या आवाहनाला प्रतिसाद देत शिवसैनिकांनी नरखेड तालुक्यात शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचून त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होत दिवाळीचा सण साजरा केला. शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख राजू हरणे यांनी या उपक्रमात पुढाकार घेत नरखेड तालुक्यातील शेतकरी आणि पशुपालकांसोबत दिवाळी साजरी केली. वावेळी शेतकरी व पशुपालकांना दिवाळी शिध्याचे वाटप करण्यात आले.

दुष्काळाच्या संकटात केवळ शेतकरीच नव्हे, तर शेतकऱ्यांच्या उदरनिर्वाहाचे महत्त्वाचे साधन असलेल्या पशुधनालाही अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. चाऱ्याची टंचाई, जनावरांच्या देखभालीचा वाढता खर्च आणि आर्थिक विवंचना यामुळे पशुपालकही अडचणीत सापडले आहेत. ही परिस्थिती लक्षात घेऊन शेतकऱ्यांसह पशुपालकांनाही दिलासा देण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. जास्तीत जास्त गरजू शेतकरी कुटुंबांपर्यंत दिवाळीचा आनंद पोहोचविण्याच्या उद्देशाने शिध्याचे वाटप करण्यात आले.

संकटाच्या काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहणे, त्यांच्या अडचणी समजून घेणे आणि त्यांच्या कुटुंबीयांना आधार देणे, हीच खरी सामाजिक बांधिलकी आहे. सण-उत्सव केवळ आनंद साजरा करण्यापुरते मर्यादित न ठेवता समाजातील अडचणीत असलेल्या घटकांसोबत आनंद वाटून घेणे, हा या उपक्रमामागील महत्त्वाचा संदेश असल्याचे वावेळी दिसून आले. शेतकऱ्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणे, त्यांच्या संकटाच्या काळात धावून जाणे आणि त्यांना मानसिक आधार देणे, हीच शिवसेनेची भूमिका असल्याचे या उपक्रमातून अधोरेखित झाले. दुष्काळाच्या सावटाखाली असलेल्या शेतकरी कुटुंबांसाठी दिवाळीच्या निमित्ताने मिळालेला हा मदतीचा हात निश्चितच दिलासादायक ठरला.

या उपक्रमाप्रसंगी मोवाड नगरपरिषदेचे शिवसेना नगरसेवक ललित खंडेलवाल, युवासेना तालुकाप्रमुख नयन पुंड, योगेश राऊत, किशोर महल्ले, अमोल खुजे, मोहन वाडसकर, संदीप फुके, गुणवंत काळे, स्वप्नील ठाकरे, प्रकाश ढोपरे, सोमराज पंचभाई, हेमंत काळे, प्रतीक ठाकरे, भूषण मतकर यांच्यासह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

थोडक्यात

उपविभागीय अधिकारी सौरभ रंगाटे यांनी काळीमातीच्या विद्यार्थिनींसोबत साजरी केली दिवाळी!

आई-वडिलांचे छत्र हरवलेल्या दोन चिमुकल्या बहिणींना दिला मायेचा आधार, नवीन कपड्यांसाठी आर्थिक मदत व मिठाईची भेट



दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव

प्रशासकीय जबाबदाऱ्या सांभाळतानाच सामाजिक बांधिलकी आणि माणुसकीचे नाते जपणारे आमगावचे उपविभागीय अधिकारी सौरभ रंगाटे यांनी आपल्या संवेदनशील कृतीतून समाजासमोर एक आदर्श निर्माण केला आहे. दिवाळीच्या सणानिमित्त त्यांनी काळीमाती येथील जिल्हा परिषद केंद्रीय वरिष्ठ प्राथमिक शाळेला सदिच्छा भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. तसेच आई-वडिलांचे छत्र हरवलेल्या दोन चिमुकल्या विद्यार्थिनींच्या घरी भेट देत त्यांच्यासोबत दिवाळीचा आनंद साजरा केला. उपविभागीय अधिकारी सौरभ रंगाटे यांनी नुकतीच जिल्हा परिषद केंद्रीय वरिष्ठ प्राथमिक शाळा, काळीमाती येथे सदिच्छा भेट दिली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षकवृंद यांच्या वतीने शाल आणि पुष्पगुच्छ देऊन त्यांचे आत्मीय स्वागत करण्यात आले.

याप्रसंगी त्यांनी शाळेतील विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला. शिक्षणाचे जीवनातील महत्त्व पटवून देतानाच जिद्द, चिकाटी, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या बळावर जीवनातील ध्येय साध्य करता येते, असे मार्गदर्शन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. विद्यार्थ्यांनी आपले ध्येय निश्चित करून त्याच्या पूर्ततेसाठी सातत्याने प्रयत्न करावेत, असे आवाहनही त्यांनी केले. त्यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साह आणि नवा आत्मविश्वास निर्माण झाला.

दोन चिमुकल्या बहिणींच्या चेहऱ्यावर फुलविला आनंद

या भेटीतील सर्वाधिक भावस्पर्शी प्रसंग म्हणजे शाळेतील श्रेया आणि ओमिका छन्नुलाल महारवाडे या आई-वडिलांचे छत्र हरवलेल्या दोन विद्यार्थिनींच्या घरी उपविभागीय अधिकारी सौरभ रंगाटे यांनी स्वतः भेट दिली. यावेळी त्यांच्या आजी आणि चुलते उपस्थित होते. दिवाळीसारख्या आनंदाच्या सणात या दोन्ही बहिणींनाही नवीन कपडे परिधान करून सणाचा आनंद घेता यावा, या भावनेतून रंगाटे यांनी स्वतःच्या वतीने त्यांना आर्थिक मदत दिली. तसेच मिठाई भेट देऊन त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविला. प्रशासकीय पदावर कार्यरत असतानाही समाजातील गरजू आणि वंचित घटकांप्रती असलेली आपुलकी त्यांनी या कृतीतून व्यक्त केली.

सणासुदीच्या काळात निराधार बालकांच्या जीवनात आनंदाचे क्षण निर्माण करण्याचा त्यांचा हा प्रयत्न उपस्थितांसाठी भावनिक आणि प्रेरणादायी ठरला. केवळ प्रशासकीय जबाबदाऱ्या पार पाडणे नव्हे, तर समाजातील गरजू वर्ग्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणे हीदेखील सामाजिक जबाबदारी आहे, याचा आदर्श त्यांनी घालून दिला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक आर. एम. बोपचे, आनंद सरवदे, नीलकंठ कांबळे, मुकुंद डोबनेउके, कविता महादुले आदी शिक्षकवृंद उपस्थित होते. उपविभागीय अधिकारी सौरभ रंगाटे यांच्या या माणुसकीपूर्ण उपक्रमाचे परिसरात कौतुक होत असून, त्यांच्या कृतीतून पदापेक्षा माणुसकी मोठी असल्याचा संदेश समाजापर्यंत पोहोचला आहे.

दिवाळीनिमित्त दुर्गामातेची भव्य रांगोळी, देवेंद्र बोकडे यांच्या कलाकृतीने गोंदियावासी मंत्रमुग्ध

रांगोळी पाहण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी, कलात्मकतेचे सर्वत्र कौतुक

दै. सिंहवाणी वृत्त, गोंदिया

दिवाळीच्या मंगलमय पर्वात रांगोळ्या माध्यमातून भक्ती आणि कलात्मकतेचा सुंदर आविष्कार गोंदियात पाहायला मिळत आहे.



श्रीनगर, चंद्रशेखर वार्ड येथील देवेंद्र चिंतामण बोकडे यांनी साकारलेली दुर्गामातेची भव्य व आकर्षक रांगोळी नागरिकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरली आहे. दुर्गामाता आणि तिचे वाहन असलेल्या वाघाचे अत्यंत सुरेख, मनमोहक व जिवंत भासणारे चित्र रांगोळीतून साकारण्यात आले आहे. विविध रंगांच्या सुंदर संगमातून दुर्गामातेचे तेजस्वी स्वरूप साकारताना कलाकाराने आपल्या कल्पकतेचा आणि कौशल्याचा अप्रतिम परिचय दिला आहे. ही रांगोळी केवळ रंगांची सजावट नसून श्रद्धा, भक्ती आणि कलात्मकतेचा सुंदर संगम ठरत आहे. या अप्रतिम कलाकृतीचे दर्शन घेण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी होत असून, देवेंद्र बोकडे यांच्या कलाकौशल्याचे सर्वत्र कौतुक केले जात आहे. दिवाळीच्या प्रकाशोत्सवात दुगामतीच्या या मनोहारी रांगोळीने गोंदियाच्या उत्सवी वातावरणात विशेष रंग भरले असून, नागरिकांचा डोळ्यांचे पारणे फेडले आहे.

वाघाच्या हल्ल्यात महिला ठार

चंद्रपूर : शेतात रोजीरोटीसाठी काम करत असतानाच दबा धरून बसलेल्या वाघाने महिलेवर अचानक झडप घातली. या भीषण हल्ल्यात संगीता पेडुकार (५५) यांचा जागीच मृत्यू झाला. बुधवारी दुपारी मूल तालुक्यातील ताडाळा परिसरात घडलेल्या या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, शेतकरी आणि शेतमजुरांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.संगीता पेडुकार या बुधवारी दुपारी शेतात काम करीत होत्या. यावेळी अचानक आलेल्या वाघाने त्यांच्यावर हल्ला केला. वाघाच्या तावडीत सापडलेल्या संगिता यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. त्यांच्यासोबत शेतात काम करणाऱ्या अन्य महिलांनी आरडाओरड करून वाघाला पळवून लावले. मात्र, तोपर्यंत संगीता यांचा जीव गेला होता. घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. या घटनेमुळे ताडाळा आणि परिसरातील गावांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

खापरखेडा पोलिसांची मध्यरात्री धडक कारवाई, दोन देशी कट्ट्यांसह दोघांना ठोकल्या बेड्या

२५ हजारांचा मुद्देमाल जप्त, एक दिवसाची पोलीस कोठडी



दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा

स्थानिक पोलीस ठाण्याच्या डीबी पथकाने ९ नोव्हेंबर सोमवारला मध्यरात्री दरम्यान खापरखेडा भीमनगर परिसरात धाड टाकून दोन देशी कट्टे जप्त केली आहे याप्रकरणी २५ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसानी जप्त केला असून न्यायालयाने आरोपींना एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. साहिल विनोद पाटील वय २२ रा भीमनगर खापरखेडा व आर्यन अजय गुप्ता वय २५ रा जयभोले नगर असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

खापरखेडा पोलीस ठाण्यातील डीबी पथक सोमवारला रात्री पेट्रोलिंग करीत होते यादरम्यान



पोलीस शिपाई शेखर वानखेडे यांना खापरखेडा भीमनगर येथील साहिल पाटील व आर्यन गुप्ता यांच्याकडे देशी कट्टे असल्याची माहिती मिळाली माहितीच्या आधारावरून डीबी पथकाने साहिल पाटील याच्या घरावर मध्यरात्री दरम्यान धाड टाकली.

पोलिसांनी साहिल याला ताब्यात घेऊन खात्री दाखवत कसून चौकशी केली असता घरात दोन देशी कट्टे लपवून ठेवल्याची कबुली दिली शिवाय सदर देशी कट्टे त्याचा नातेवाईक आर्यन गुप्ता याने दिल्याचा खुलासा केला सदर घटनेची माहिती मिळताच पोलीस उपनिरीक्षक अविनाश निकाळजे पथकासह घटनास्थळी पोहोचले यावेळी घराची झडती घेतली असता काळपट चंदेरी रंगाची आणि गंजलेल्या अवस्थेतील दोन देशी कट्टे आढळून आले. पोलिसांनी घटनास्थळ पंचनामा करून दोन्ही देशी कट्टे जप्त केले विशेष म्हणजे पारदर्शकता राखण्यासाठी या संपूर्ण कारवाईदरम्यान आधुनिक ई-साक्ष प्रणालीचा वापर करून डिजिटल पुरावे नोंदवण्यात आले.

पोलीस शिपाई शेखर वानखेडे यांच्या फियार्दीवरून आरोपी विरुद्ध कलम ३, २५ भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ अन्वये गुन्हा दाखल करून दोघांना अटक करण्यात आली असून न्यायालयातून एक दिवसाची पोलीस कोठडी मिळविली असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अविनाश निकाळजे करीत आहेत.

ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप बुवा साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अविनाश निकाळजे, पोहवा मुकेश महालगावे, संदीप सगने, शेखर वानखेडे, आशिष मेश्राम, अमित खोबागडे, नील गंगावणे, बादल गिरी, शोयब व विशाल नाकले यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

चाचेर येथे दिव्यांग बांधव व गरजू लाभार्थ्यांना दिवाळीच्या आनंदाच्या शिध्याचे वाटप

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावतीने, राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम

दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा

दिवाळीचा सण सर्वांच्या जीवनात आनंद, उत्साह आणि समाधान घेऊन यावा, या सामाजिक भावनेतून महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वतीने तसेच राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या मार्गदर्शनाखाली चाचेर येथे दिव्यांग बांधव व गरजू लाभार्थ्यांना दिवाळीनिमित्त आनंदाच्या शिध्याचे वाटप करण्यात आले. समाजातील गरजू, वंचित आणि दिव्यांग बांधवांनाही दिवाळीचा आनंद साजरा करता यावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.



सण-उत्सवाच्या काळात समाजातील शेवटच्या घटकापर्यंत मदतीचा हात पोहोचवणे, त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवणे आणि त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणे, हीच खऱ्या अर्थाने समाजसेवा असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. शिवसेनेच्या माध्यमातून समाजातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, दिव्यांग बांधव आणि गरजू घटकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा संकल्प यावेळी अधोरेखित करण्यात आला.

"मदतीचे तोरण, हेच शिवसेनेचे धोरण!" या भावनेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे लाभार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. रामटेक विधानसभा क्षेत्रातील बळीराजा पांधन रस्ता समिती सदस्य विकास झाडे, शिवसेना समन्वय राहुल सोमनाथे सर्व लाभार्थ्यांना त्यांच्या घरी जाऊन या आनंदाच्या शिधाचे वाटप करत व लाभार्थ्यांना दीपावलीच्या मनःपूर्वक शुभेच्छा देत आहेत.

दृष्टिहीन क्रिकेटपटूंच्या कौशल्यांचा रंगणार थरार

'अवादा विदर्भ व्हिजन कप' अंध क्रिकेट स्पर्धेचे १३ नोव्हेंबर रोजी उद्घाटन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

दृष्टिहीन क्रिकेटपटूंमधील क्रीडा गुणवत्तेला प्रोत्साहन देण्यासह त्यांना आपले कौशल्य दाखविण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने अवादा फाउंडेशन प्रस्तुत ह्यअवादा विदर्भ व्हिजन कप अंध क्रिकेट स्पर्धा झ २०२६ह्मचे आयोजन १४ ते १७ नोव्हेंबरदरम्यान करण्यात आले आहे. असोसिएशन फॉर प्रमोशन ऑफ ब्लाइंड क्रिकेट इन विदर्भ आणि नागपूर येथील आत्मदीपम सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा मुजुमदार क्रिकेट अकादमीच्या मैदानावर होणार आहे.

या स्पर्धेचे उद्घाटन १३ नोव्हेंबर रोजी नागपूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद (आयएएस) यांच्या हस्ते होणार आहे. अंध क्रिकेटला प्रोत्साहन देण्याच्या आपल्या बांधिलकीचा भाग म्हणून अवादा समूह आत्मदीपम सोसायटीला या खेळाच्या प्रचार आणि विकासासाठी वर्षभर सहकार्य करणार आहे. यासंदर्भातील सामंजस्य करार (एमओयू) उद्घाटन सोहळ्यादरम्यान करण्यात येणार आहे. या कराराच्या आदान-प्रदान सोहळ्याला अवादा इलेक्ट्रोचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रणव कोमेरवार, प्लांट हेड पंकज कुमार यांच्यासह पंकज उपाध्याय, प्रशांत कोमल, मृदुल गहलोत, डॉ. सारिका कोमेरवार, संकल्प दुबे, दीपक कुमार जेना आणि सौरभ आवचट उपस्थित राहणार आहेत.

या स्पर्धेत नागपूर, अमरावती, अकोला आणि चंद्रपूर येथील दृष्टिहीन खेळाडूंच्या चार संघांचा सहभाग राहणार आहे. १४ ते १६ नोव्हेंबरदरम्यान दररोज सकाळी ८.३० आणि दुपारी १२.३० अशा दोन सत्रांत सामने खेळविण्यात येतील. स्पर्धेचा अंतिम सामना १७ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजता होईल. त्यानंतर दुपारी १ वाजता पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आला आहे.

आत्मदीपम सोसायटी आणि असोसिएशन फॉर प्रमोशन ऑफ ब्लाइंड क्रिकेट इन विदर्भच्या अध्यक्षा जिज्ञासा चव चवलढाल, उपाध्यक्ष आकाश कुबडे तसेच सदस्य अंजली साखरकर, जयंत गुलकरी, योगेश्वर चवलढाल, गुरुदास राऊळ आणि अतुल हरोडे हे स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेत आहेत. अदानी इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च या स्पर्धेचे वैद्यकीय भागीदार असून, स्पर्धेदरम्यान खेळाडूंना आवश्यक वैद्यकीय सुविधा व सहकार्य उपलब्ध करून देणार आहेत.

पर्यटन विकासासोबत सामाजिक बांधिलकी जपणारे चौकसे कुटुंबीयांचे कार्य प्रेरणादायी

पोलिस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांचे गौरवोद्गार, सहपरिवार रामधाम तीर्थला दिली सदिच्छा भेट



दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

महाराष्ट्रातील वरिष्ठ आयपीएस अधिकारी तथा नागपूरचे पोलिस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी मंगळवार दी. १० नोव्हेंबर रोजी सहपरिवार मनसर येथील जगप्रसिद्ध रामधाम तीर्थला सदिच्छा भेट दिली. यावेळी रामधामचे संस्थापक तथा पर्यटक मित्र चंद्रपाल चौकसे, संध्या चंद्रपाल चौकसे आणि त्यांचे सुपुत्र गौरव चौकसे यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे उत्साहात स्वागत केले.

या भेटीदरम्यान नांगरे पाटील यांनी रामधाममधील धार्मिक, सांस्कृतिक, पर्यटन आणि सामाजिक उपक्रमांची सविस्तर माहिती जाणून घेतली. रामधामच्या माध्यमातून पर्यटन विकासासोबतच सामाजिक बांधिलकी जोपासण्यासाठी राबविण्यात येणारे विविध उपक्रम पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील वधू-वरांसाठी आयोजित करण्यात येणाऱ्या मोफत सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याची माहिती त्यांना देण्यात आली. या उपक्रमातून आतापर्यंत तब्बल १ हजार ४१७ जोडप्यांचे विवाह संपन्न झाल्याचे समजताच त्यांनी चौकसे कुटुंबीयांचे विशेष कौतुक केले.

समाजातील गरजू कुटुंबांना विवाहाचा आर्थिक भार कमी करण्यासाठी दिला जाणारा हा आधार निश्चितच कौतुकास्पद असून, सामाजिक एकोपा आणि सर्वधर्मसमभावाचा संदेश देणारा आहे. केवळ पर्यटनस्थळ विकसित करण्यापुरते मर्यादित न राहता समाजातील गरजू घटकांसाठीही सातत्याने कार्य करण्याची चौकसे कुटुंबीयांची भूमिका प्रेरणादायी असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले.

यानंतर त्यांनी रामधाममधील विविध पर्यटन आकर्षणांची पाहणी केली. गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद असलेली ३५० फूट लांबीची भव्य ओम प्रतिकृती, आकर्षक जलपरी शो, लाईट हाऊस वॉटर पार्क, फिश अक्वेरियम, अम्युझमेंट पार्क आणि सुवी बर्ड पार्क यांसारख्या विविध आकर्षणांची माहिती घेतली. रामधाममध्ये धार्मिक श्रद्धा, सांस्कृतिक वारसा, मनोरंजन आणि आधुनिक पर्यटन सुविधांचा करण्यात आलेला सुंदर संगम त्यांनी अनुभवला.

मनोरंजन आणि पर्यटनाच्या माध्यमातून पर्यटकांना आकर्षित करतानाच सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव ठेवून राबविण्यात येणारे उपक्रम हे रामधामचे वेगळेपण असल्याचे त्यांनी यावेळी अधोरेखित केले.

पर्यटन क्षेत्रातील विकासासोबतच समाजहिताचे कार्य करणारे चंद्रपाल चौकसे यांचे योगदान निश्चितच प्रेरणादायी आहे, असेही त्यांनी आवर्जून सांगितले. नागपूरचे पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांच्या या सदिच्छा भेटीमुळे रामधाम परिवारात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. चौकसे कुटुंबीयांनीही त्यांच्या भेटीबद्दल आभार व्यक्त केले.

रामधामची सामाजिक आणि पर्यटन क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी

१,४१७ जोडप्यांचे विवाह : आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील वधू-वरांसाठी मोफत सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन.

३५० फूट भव्य ओम प्रतिकृती : गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद असलेले प्रमुख आकर्षण.

विविध पर्यटन सुविधा : जलपरी शो, लाईट हाऊस वॉटर पार्क, फिश अक्वेरियम, अम्युझमेंट पार्क आणि सुवी बर्ड पार्क.

सामाजिक बांधिलकी : पर्यटन विकासासोबत सर्वधर्मसमभाव, सामाजिक एकोपा आणि गरजू कुटुंबांना मदतीचा हात.

नगरधन परिसरातील ६९९ शेतकऱ्यांचा कर्जमाफीचा मार्ग मोकळा!

राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या पुढाकाराने कर्जमाफी यादीत नावे समाविष्ट करण्याची प्रक्रिया पूर्ण; उद्यापर्यंत पोर्टलवर नोंदणी होणार

दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

नगरधन परिसरातील ६९९ शेतकऱ्यांची नावे कर्जमाफीच्या यादीतून वगळली गेल्याने निर्माण झालेल्या प्रश्नाची राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी गंभीर दखल घेतली आहे. संबंधित शेतकऱ्यांनी जयस्वाल यांची भेट घेऊन आपली समस्या मांडल्यानंतर त्यांनी तातडीने प्रशासकीय यंत्रणेला कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार मंगळवार, दिनांक १० नोव्हेंबर २०२६ रोजी रामटेक येथील त्यांच्या संपर्क कार्यालयात संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक घेऊन सविस्तर आढावा घेण्यात आला.

या बैठकीला जिल्हा उपनिबंधक, जिल्हा विकास व्यवस्थापक, लीड बँकेचे अधिकारी, युको बँकेचे अधिकारी तसेच सहाय्यक निबंधक उपस्थित होते. बैठकीत नगरधन परिसरातील ६९९ शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा प्रश्न प्राधान्याने हाताळण्यात आला. बैठकीनंतर या सर्व शेतकऱ्यांची नावे कर्जमाफीच्या यादीत समाविष्ट करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. सध्या ही यादी युको बँकेच्या झोनल कार्यालयामार्फत अपलोड करण्याचे काम सुरू असून,



उद्यापर्यंत ही प्रक्रिया पूर्ण होणार आहे. त्यानंतर राज्य शासनाच्या कर्जमाफी पोर्टलवर संबंधित शेतकऱ्यांची नोंदणी होऊन त्यांना कर्जमाफीचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

कर्जमाफीबाबत शेतकऱ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना

राज्य शासनाच्या कर्जमाफी योजनेनुसार १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत कर्ज घेतलेल्या आणि ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत कर्ज थकीत असलेल्या पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीचा लाभ देण्यात येत आहे.

ज्या शेतकऱ्यांचे कर्ज दोन लाख रुपयांपेक्षा अधिक आहे, त्यांनी दोन लाख रुपयांवरील उर्वरित रक्कम ३१ मार्च २०२७ पूर्वी भरल्यास त्यांनाही कर्जमाफीचा लाभ मिळू शकणार आहे. तसेच कर्जदार शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाला असल्यास त्यांच्या वारसांनाही कर्जमाफीचा लाभ अनुज्ञेय राहणार आहे.

ई-केवायसी, आधारविषयक अटी किंवा ऑनलाइन आधार ऑथेंटिकेशनमधील तांत्रिक अडचणींमुळे ज्या शेतकऱ्यांचा कर्जमाफीचा लाभ प्रलंबित आहे, अशा शेतकऱ्यांनी राज्यमंत्री अँड. आशिष जयस्वाल यांच्या संपर्क कार्यालयात लेखी तक्रार सादर करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच कर्जमाफीसंदर्भात कोणतीही अडचण किंवा तक्रार असल्यास शासनाच्या पोर्टलवरील तक्रार निवारण सुविधेचा वापर करावा, असेही सांगण्यात आले आहे.

नगरधन परिसरातील ६९९ शेतकऱ्यांचा प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी राज्यमंत्री अँड. आशिष जयस्वाल यांनी केलेल्या पुढाकारामुळे शेतकरी वर्गाला मोठा दिलासा मिळाला आहे.